## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

### सर्व साधारण सभा

मंगळवार दिनांक २८.१.२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. श्री अ.सत्तार अ.गफुर,महापौर**

**सर्वश्री /श्रीमती**

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजीराव दत्तराव | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| स्वामी शैलजा किशोर | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| पांढरे स्नेहा सुधाकर | फारुख अली खॉ इलियास खॉ |
| मुंडे शांता मोतीराम | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| आनेवार गंगासागर संदीप | भवरे किशोर दामोधर |
| कदम शिला सुनिल | कनकदंडे मोहिनी महेशराव |
| स.जानी म.कासीम. | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदीराज कमलाबाई रामस्वामी |
| रजियाबेगम अय्युबखान | सलीमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलींद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बाळासाहेब गंगाधरराव |
| सय्यदा इजरत फातेमा मजहर हुसेन | गफारखान गुलाम महमंदखान |
| धबाळे गणपत गुणाजी | अनुजा अमितसिंह तेहरा |
| शर्मा पुषाताई राजेश. | ज्योती महेंद्र खेडकर |
| नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजितसिंघ पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| बिपाशा बेगम सय्यद वजिउध्दीन | अब्दुल फसीया फिरदोस |
| आसिया बेगम अ.हबीब बागवान | स.शेर अली स.महेबूब अली |
| कुरेशी चॉदपाशा खाजा | फारुख हुसेन कासिमसाब |
| राखेवार सतिष शेषप्पा | कुरेशी शफि अहेमद |
| चाऊस हसीना बेगम साबेर | जकिया बेगम स.मुखतार |
| गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल | बावजीर शेख हबीब शे. अब्दुल्ला |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह. | किशोर यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधराव |
| अभिषेक सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषकराव |
| सौ.ललिता मुकुंदराव बोकारे | विनय विश्वाभंरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| ॲड.बन श्याम वामनराव | अल केसरी हसन बिन उबेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री अ.सत्तार अ,गफूर, हे होते. तसेच श्री जी श्रीकांत, आयुक्त, श्री राजेंद्र खंदारे, उपआयुक्त, महसुल, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (पा.पू.व म.नि.वि.), सौ.विद्या गायकवाड, उपआयुक्त (प्रशासन), सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री कोळेकर,कार्यकारी अभियंता, सौ.वसुधा फड, स.आयुक्त एलबीटी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोगय, श्री जोशी, शिक्षणाधिकारी, श्री गिरीष कदम, अभियंता.नांवामनपा नांदेड व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** उपस्थित सर्व स.सदस्य.आयुक्त,सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरवात करण्यात येते.

**दिपकसिंह रावत** तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे जेष्ठ सदस्य,स्वातंत्र सैनिक व जेष्ठ संपादक सुधाकररावजी डोइफोडे याचे दि.२२.१.२०१४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झालेले आहे. स्व.सुधाकररावजी डोईफोडे यांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक, विकासाचे प्रश्न, रेल्वेचे प्रश्न, दै.प्रजावाणी वर्तमानपत्रात मांडून ते शासनापर्यत पोहोचविण्याचे कार्य केलेले आहे आणि त्याचा फायदा राज्याला,मराठवाडयाला व नांदेड शहराला झालेला आहे. त्यांनी लेखनीव्दारे केलेले मार्गदर्शन नांदेड शहरातील जनता केंव्हाच विसरु शकणार नाही.आज ते जरी आपल्याबरोबर नसले तरी त्यांचे आचार विचार आपल्या बरोबर आहे अशा महान संपादकाला भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव मी मांडत आहे त्यास सर्व सभागृहाने मान्यता द्यावी.तसेच महापौरांना माझी विनंती आहे की. पत्रकार स्व.सुधाकररावजी डोईफोडे यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून व त्यांची आठवण नागरीकांना सदैव रहावी म्हणून त्याचे नांवाने शंहरात एक स्मारक उभे करावे किंवा त्यांचे नांव महानगरपालिकेच्या रस्त्याला,इमारतीला देण्यात यावे या करीता एक उपसमिती कायम करण्यात यावी व उपसमितीने कै.सुधाकररावजी डोईफोडें यांचे कुटूंबियांना भेटून त्यांना महानगरपालिकेचा निर्णय कळविण्यात यावा. व त्याचेही मत जाणून घेण्यात यावे.

**सरजितसिंघ गिल** विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांनी स्वातंत्र सैनिक, संपादक स्व.सुधाकररावजी डोईफोड यांना श्रध्दांजलीचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनूमोदन आहे.तसेच मुंबई येथील दलित पॅथरचे संस्थापक व साहित्यीक स्व.नामदेवराव ढसाळ यांचेही दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**रामनारायणजी काबरा** स्वातंत्र सैनिक,प्रजावाणीचे जेष्ठ संपादक, स्व.सुधाकररावजी डोइफोडे तत्कालिन नांदेड नगरपालिकेच्या काळात १९६७ व १९८५ ला आमचे बरोबर नगरसेवक म्हणून निवडून आले होते त्यानी शिक्षण सभापती पदावरही चांगले काम केलेले आहे.शहराच्या विकासाठी त्यांचा नेहमीच सहभाग राहिलेला आहे प्रजावाणीत त्यांनी अग्रलेख लिहिलेले असून त्याचे अग्रलेखाचे पुस्तकही प्रकाशीत झालेले आहे.त्यांची नागरीकांना कायम स्मृती रहावी म्हणून त्यांचे स्मारक करण्याचा प्रस्ताव श्री दिपकसिंह रावत यांनी मांडला आहे त्यास माझे अनुमोदन आहे. स्व.डोईफोडे यांनी मराठवाडयातील नागरीकांना रेल्वेची सुविधा अधिक चांगल्या प्रकारे मिळावी रेल्वेच्या संख्या वाढवावी, अकोला, अमरावती, बीड,नगर बॉडग्रेज होण्यासाठी रेल्वे संघर्ष समितीच्या माध्यमातून अनेक आंदोलने केलेली आहेत.आम्ही जेव्हा जेव्हा रेल्वे मंत्र्यास भेटस असे त्यावेळी त्यांनी वारंवार नांदेड रेल्वे डिव्हीजन पश्चिम मध्य रेल्वे डिव्हीजनला जोडावे ही आग्रहाची मागणी कैलेली आहे मात्र त्यांचे हे स्वप्न अधुरे राहिलेले आहे. महानगरपालिकेने ठराव घेवून नांदेड रेल्वे डिव्हीजन पश्चिम मध्य रेल्वे डिव्हीजनला जोडण्याची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे करण्यात यावी

**किशोर यादव** महानगरपालिकेचे सेवा निवृत्त मुख्य स्वच्छता निरिक्षक डि.टि.मोरे,यांचे नुकतेच अपघाती निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**गफारखान** नांदेड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष,गृहनिर्माण महा मंडळाचे माजी अध्यक्ष श्री हरिहरराव भोसीकर याच्या मातोश्री कै.गिरजाबाई भोसीकर यांचेही वृध्दापकाळाने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** स्वातंत्र सैनिक ,माजी नगरसेवक,प्रजावाणीचे जेष्ठ संपादक स्व.सुधाकररावजी डोईफोडे यांचे दि.२२ तारखे्स दुःखद निधन झालेले आहे. रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष असतांना त्यांनी अनेक रेल्वेचे प्रश्न सोडविलेले आहे. तसेच शहराच्या विकासासाठीही त्यांचे मोठे योगदान राहिलेले आहे.नागरीकांना त्यांची आठवण रहावी म्हणून त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ स्मारक उभारण्याबाबत किंवा महानगरपालिकेच्या रस्त्याला, प्रकल्पाला, इमारतीला नांव देण्याच्या संदर्भात त्यांच्या कुटुंबियाला विचारणा करुन पुढील सभेत प्रस्ताव ठेवून निर्णय घेण्यात येईल.

**ठराव क्र.१८२** **ठराव**

तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे जेष्ठ सदस्य,स्वातंत्र सैनिक व जेष्ठ संपादक सुधाकररावजी डोइफोडे याचे दि.२२.१.२०१४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झालेले आहे. स्व.सुधाकररावजी डोईफोडे यांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक, विकासाचे प्रश्न, रेल्वेचे प्रश्न, दै.प्रजावाणी वर्तमानपत्रात मांडून ते शासनापर्यत पोहोचविण्याचे कार्य केलेले आहे आणि त्याचा फायदा राज्याला,मराठवाडयाला व नांदेड शहराला झालेला आहे. त्यांनी लेखनीव्दारे केलेले मार्गदर्शन नांदेड शहरातील जनता केंव्हाच विसरु शकणार नाही.आज ते जरी आपल्याबरोबर नसले तरी त्यांचे आचार विचार आपल्या बरोबर आहे अशा महान संपादकाला हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन त्यांच्या कुंटूंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र.१८३** **ठराव**

मुंबई येथील साहित्यीक,पत्रकार तथा दलित पॅथरचे संस्थापक नामदेवरावजी ढसाळ यांचे दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन त्यांच्या कुंटूंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र.१८४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे सेवा निवृत्त मुख्य स्वच्छता निरिक्षक डि.टि.मोरे. यांचे नुकतेच अपघाती निधन झालेले असल्यामूळे त्यांना तसेच नांदेड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष,गृहनिर्माण महा मंडळाचे माजी अध्यक्ष श्री हरिहरराव भोसीकर याच्या मातोश्री कै.गिरजाबाई भोसीकर यांचेही वृध्दापकाळाने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन त्यांच्या कुंटूंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**सरजितसिंघ गिल.** गुरुव्दारा बोर्डाचे सुरक्षा रक्षक श्री भिमसिंघ गिल यांना खेळामध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्याबदल त्याचे अभिनंदन करण्यात यावे.

**दिपकसिंह रावत** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. गुरुव्दारा बोर्डाचे सुरक्षा रक्षक श्री भिमसिंघ गिल यांचा सभागृहात सत्कार करण्यात यावा

**महापौर** श्री सुरजितसिंघ गिल यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.१८५** **ठराव**

गुरुव्दारा बोर्डाचे सुरक्षा रक्षक श्री भिमसिंघ गिल यांना खेळामध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्या बध्दल त्यांचे हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते हार्दिक अभिनंदन करते, तसेच महानगरपालिकेच्या वतीने त्यांचा महासभेत सत्कारही करण्यात यावा असेही ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते संमत करते.

**गफारखान** सभेचे कामकाज नियमानुसार विषय पत्रिकेवर विषय क्र.१ हा मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय असावयास पाहिजे परंतु मागील दोन सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय आजच्या विषय पत्रिकेवर का आला नाही.प्रोसीजर काय आहे याबाबत नगरसचिवांनी खुलासा करावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** या पुढील सभेत विषयपत्रिकेसह मागील सभेचे इतिवृत्त देण्यात येईल.

**महापौर** आज पर्यत झालेल्या सर्व सभेचे इतिवृत्त स.सदस्यंना देण्यात आलेले असून त्यास सभागृहाचे मान्यता घेण्यात आलेली आहे.फक्त एकाच दिवशी दोन झालेल्या मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचे आहे ते पुढील सभेच्या विषयपत्रिकेबरोबर देण्यात येईल.

**रामनारायणजी काबरा** स.सदस्यांना नियमानुसार सर्वसाधारण सभेचे नोटीस (७) दिवस अगोदर द्यावयास पाहिजे परंतु असे होत नाही. मला आजच्य सभेची नोटीस काल मिळाली स.सदस्यांना अभ्यासासाठी कमीत कमी २-३ दिवस तरी अगोदर मिळाली पाहिजे.

**नगरसचिव** नविन शिपायाला स.सदस्यंाचे घरे माहिती नसल्यामूळे काही स.सदस्यंाना उशिरा विषय पत्रिका उशिरा मिळाल्या यापुढे लवकरात लवकर विषय पत्रिका वाटप करण्यात येतील.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या रस्त्याची कामे अनेक दिवसापासून प्रलंबित राहिलेले आहे.या रस्त्याची कामे पावसाळयापुर्वी करणे आवश्यक आहे.नंतर पावसाळयात या रस्त्याची कामे करता येणार नाही.सदरील रस्त्याची कामे करण्याकरीता आयुक्ताना,महापौरांना अधिकार देण्यात आलेले आहे. करीता आयुक्तांना विंनती आहे की. सदरील रस्त्याची कामे लवकरात लवकर हाती धेवून ती पुर्ण करण्यासाठी संबंधीतास आदेशित करण्यात यावे

**स.शेर अली** नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेली रस्त्याची कामे ५० टक्के पुर्ण झालेली असुन उर्वरीत कामे पुर्ण केली नाही तर केलेला सर्व खर्च वाया जाईल या रस्त्याच्या कामाबाबत देशोन्नतीमध्ये बातमी प्रसिध्द होवून महानगरपालिकेची खिल्ली उडविली आहे करीता सदरील रस्त्याची कामे तात्काळ हाती घेवून लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावी.

**गफारखान** नगरोत्थान योजने अंतर्गत रस्त्याची कामे करण्यासाठी महापौर व आयुक्तांना अधिकार दिलेले आहे

**महापौर** निधी अभावी नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या रस्त्याची कामे अर्धवट आहे.करीता या कामाकरीता निधी उभारण्यासाठी आयुक्तांनी प्रस्ताव दिलेला त्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येइल

**शीला कदम** पुर्वीपेक्षा चार पाच पटीने अवास्तव कराची आकारणी करण्यात आल्यामूळे नागरीक स.सदस्यंाकडे तक्रारी करीत आहेत त्यामूळे मालमत्ता कर कमी करण्यात यावा.

**रामनारायणजी काबरा** मालमत्ता कराच्या संदर्भात आयुक्तांनी नागरीकांसमोर आपली भूमिका मांडली दोन्ही तरोडा व सिडको हडकोचा भाग नव्याने महानगरपालिका हध्दीत समावेश झालेला असून याभागातील मालमत्ताना मालमत्ता कराची आकारणी करतांना चुका झालेल्या आहेत.मालमत्ता करात वाढ करताना नियमानुसार रहिवाशी वापरात असलेल्या इमारती मागील मालमत्ता करापेक्षा दुपटीपेक्षा अधिक व

| | |
|---|---|
| | वाणिज्य वापरातील इमारतींना तीप्पटी पेक्षा अधिक मालमत्ता कर आकारता येत नाही परंतु नागरीकांना दुप्पट तिप्पट पेक्षा अधिक पटीने मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.टप्या टप्याने कर वाढवावयास पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. |
| **बाळासाहेब देशमूख** | नागरीकांना पुर्वीपेक्षा पाच पटीने मालमत्ता कर वाढविण्यात आलेला असल्यामूळे नागरीकामध्ये मोठया प्रमाणावर असंतोंष आहे.कर कमी करण्यात यावा. |
| **महापौर** | मालमत्ता कराच्या संदर्भात विषय पत्रिकेवर विषय असून हा विषय सभागृहात मांडल्यानतर त्यावर चर्चा करण्यात यावी |

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे सुधारीत कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियमातील ४-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशनाद्वारे ११ (अकरा) सदस्याची नियुक्ती (स्थायी समितीवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या सदस्याप्रमाणे) महासभेने दिनांक २४.१२.२०१२ रोजी केलेली असून महानगरपालिका सभेचे कामकाज नियम ४ क नुसार प्रत्येक विशेष समिती तिची रचना झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष मुदतीपूर्व काम करण्याचे चालू ठेवील अशी तरतूद आहे त्यामुळे महिला व बाल कल्याण समितीवर ११ सदस्याची निवड ही दि.२४.१२.२०१३ पुर्वी महासभेस करावी लागेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे सुधारीत कलम ३१ (अ) मधील तरतुदी नुसार महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियमातील ४-ब नुसार नामनिर्देशनाद्वारे ११ (अकरा) सदस्यांची नियुक्ती हि मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनीक संख्याबळ विचारात घेवून करावयाची असून शासन राजपत्रनुसार खालील प्रमाणे मान्यता प्राप्त पक्षाचे नोंदणीकृत पक्षाचे/अपक्षाचे संख्याबळ असून त्या त्या पक्षाच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे तौलनीकबळानुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर सदस्यांची संख्या येते.

| अ क्र. | पक्षाचे / अपक्षाचे संख्याबळ | तौलनीक बळ | पक्षास मिळणारी सदस् |
|---|---|---|---|
| १ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अपक्ष, **(४२)**<br>**४२ X ११** = ५.७०<br>८१ | ५.७० | ६ |
| २ | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, **(१०)**<br>**१० X ११** = १.३५<br>८१ | १.३५ | १ |
| ३ | शिवसेना, भारतीय जनता पार्टीची आघाडी<br>**१६ X ११** = २.१७<br>८१ | २.१७ | २ |
| ४ | ऐआयएमआयएम ,संविधान पार्टी (१३)<br>**१३ X ११** = १.७६<br>८१ | १.७६ | २ |

करीता उपरोक्त प्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये नांवाशमनपाकेच्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीच्या अकरा जागांवर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ नुसार नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यासाठी मनापा सर्व साधारण सभे समोर प्रस्ताव सादर.

**टिप :-** (मु.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अ नुसार महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे महिला पालिका सदस्यांमधील असतील अशी तरतुद असल्यामुळे ७५ टक्के प्रमाणे एकूण ८ महिला सदस्यांची नियुक्ती करावी लागेल )

1) शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण २०१०/प्रक्र.-८५/नवि-३२ दि. ६ जुलै २०१० नुसार सभागृह नेते/विरोधी पक्षनेते मार्फत किंवा गट नेत्या मार्फत पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौरांकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयातच आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

| | |
|---|---|
| **महापौर** | सभागृह नेते,विरोधी पक्षनेते, एमआयएम-संविधान आघाडीचे गटनेते, राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते यांनी संख्याबळानूसार ११ सदस्यांची नांवे बंद पाकीटात दिलेली असून ती नांवे उपमहापौर वाचुन दाखवतील. |
| **उपमहापौर** | सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सौ.स्वामी शैलजा किशोर,सौ.अन्नेवार गंगासागर संदिप, सौ.जिंदम पार्वती व्यंकटेश, सौ.इशरत फातेमा अ.शमीम सौ.शर्मा पुष्पाताई राजेश सौ.देशमूख मंगला गजानन,राष्ट्रवादी पक्षाच्या गटनेत्या सौ.शीला कदम यांनी सौ.सय्यदा इतरत फातेमा मजहर हुसेन,विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांनी सौ.नागाबाई भूजंगराव कोकाटे,सौ.ज्योती महेंद्र |

खेडकर एमआयएम-संविधान पार्टीचे गटनेते श्री स.शेर अली यांनी सौ.जकिया बेगम सय्यद मुखतार सौ.गायकवाड अंजली सुरेश यांची नांवे दिलेली आहेत.

**महापौर** आलेल्या नांवावर कोणाचाही आक्षेप आलेला नसल्यामूळे १)सौ.स्वामी शैलजा किशोर,२)सौ.अन्नेवार गंगासागर संदिप,३)सौ.जिंदम पार्वती व्यंकटेश,४)सौ.इशरत फातेमा अ.शमीम ५)सौ.शर्मा पुष्पाताई राजेश ६) सौ.देशमूख मंगला गजानन,७) सौ.सय्यदा इतरत फातेमा मजहर हुसेन,८)सौ.नागाबाई भूजंगराव कोकाटे,९)सौ.ज्योती महेंद्र खेडकर१०) सौ.जकिया बेगम सय्यद मुखतार ११) सौ.गायकवाड अंजली सुरेश या महिला सदस्यांची पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ,महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती झाल्याचे जाहिर करण्यात येते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १८६** **ठ रा व**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व सुधारीत कलम ३१ (अ) मधील तरतूदी नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे/नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता,ऐआयएमआयएम व संविधान आघाडी राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते यांनी शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण २०१०/प्रक्र.-८५/नवि-३२ दि. ६ जुलै २०१० मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासाठी बंद पाकीटात दिलेल्या नांवा प्रमाणे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर खालील प्रमाणे (११) पालिका महिला सदस्याची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| १) सौ.स्वामी शैलजा किशोर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| २) सौ.अन्नेवार गंगासागर संदिप | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| ३) सौ.जिंदम पार्वती व्यंकटेश | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| ४) इशरत फातेमा अ.शमीम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| ५) सौ.शर्मा पुष्पाताई राजेश | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| ६) सौ.देशमूख मंगला गजानन | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व अपक्ष आघाडी |
| ७) सय्यदा इतरत फातेमा मजहर हुसेन | राष्ट्रवादी पक्ष |
| ८) सौ.नागाबाई भूजंगराव कोकाटे | शिवसेना व भारतीय जनता पार्टी आघाडी |
| ९) सौ.ज्योती महेंद्र खेडकर | शिवसेना व भारतीय जनता पार्टी आघाडी |
| १०) सौ.जकिया बेगम सय्यद मुखतार | ऐआयएमआयएम व संविधान आघाडी |
| ११) सौ.गायकवाड अंजली सुरेश | ऐआयएमआयएम व संविधान आघाडी |

**विषय क्र. २ :-**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

**लिंग गुणोत्तर -२०१३**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म | | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | जानेवारी | १०५९ | ९०५ | १९६४ | ८५४.५७ |
| २. | फेब्रुवारी | ११०६ | ९२१ | २०२७ | ८३२.७३ |
| ३. | मार्च | २८०५ | २४७३ | ५२७८ | ८८१.६३ |
| ४. | एप्रिल | १४७४ | १३१४ | २७८८ | ८९१.४५ |
| ५. | मे | १९३१ | १७५४ | ३६८५ | ९०८.३३ |
| ६. | जुन | ५०५५ | ४७६६ | ९८२१ | ९४२.८२ |
| ७. | जुलै | ४२९६ | ३७७४ | ८०७० | ८७८.४९ |
| ८. | ऑगस्ट | ८२४ | ६८१ | १५०५ | ८२६.४५ |
| ९. | सप्टेंबर | ७१६ | ५६४ | १२८० | ७८७.७० |
| १०. | ऑक्टोबर | १०२९ | ८४८ | १८७७ | ८२४.१० |
| ११. | नोव्हेंबर | २४७२ | २१७२ | ४६४४ | ८७८.६४ |
| १२ | डिसेंबर | २२२६ | १९०० | ४१२६ | ८५३.५४ |
| | एकुण | २४९९३ | २२०७२ | ४७०६५ | ८८३.१२ |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.१८७** **ठ रा व**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची माहिती देण्यात आली त्याची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**लिंग गुणोत्तर -२०१३**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म | | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | जानेवारी | १०५९ | ९०५ | १९६४ | ८५४.५७ |
| २. | फेब्रुवारी | ११०६ | ९२१ | २०२७ | ८३२.७३ |
| ३. | मार्च | २८०५ | २४७३ | ५२७८ | ८८१.६३ |
| ४. | एप्रिल | १४७४ | १३१४ | २७८८ | ८९१.४५ |
| ५. | मे | १९३१ | १७५४ | ३६८५ | ९०८.३३ |
| ६. | जुन | ५०५५ | ४७६६ | ९८२१ | ९४२.८२ |
| ७. | जुलै | ४२९६ | ३७७४ | ८०७० | ८७८.४९ |
| ८. | ऑगस्ट | ८२४ | ६८१ | १५०५ | ८२६.४५ |
| ९. | सप्टेंबर | ७१६ | ५६४ | १२८० | ७८७.७० |
| १०. | ऑक्टोबर | १०२९ | ८४८ | १८७७ | ८२४.१० |
| ११. | नोव्हेंबर | २४७२ | २१७२ | ४६४४ | ८७८.६४ |
| १२ | डिसेंबर | २२२६ | १९०० | ४१२६ | ८५३.५४ |
| | एकुण | २४९९३ | २२०७२ | ४७०६५ | ८८३.१२ |

**विषय क्र.३**

बिएसयुपी विभागातील प्रतिमहा एकत्रित वेतनावरील कनिष्ट अभियंता यांनी त्यांच्याकडे विविध झोन निहाय झोपडपट्टी भागातील घरकुलांचे कामाबाबत नियुक्ती केली असून त्यानुसार त्यांना सदर झोपडपट्टी भागामधील घरकुल बांधकाम व मुलभूत सुविधांचे कामाची पाहणी तसेच लाभार्थ्याची तक्रारीचे निवारणासाठी विविध भागात फिरावे लागत असल्यामुळे ते वापरात असलेल्या वाहनांचा इंधन खर्च देण्याची विनंती केली आहे. याबाबत बिएसयुपी विभागात कार्यरत कनिष्ट अभियंता यांची प्रतिमहा रु.१०,०००/- एकत्रित वेतनावर नियुक्ती असून त्यांना झोपडपट्टी निहाय घरकुल बांधकाम नियंत्रणाबाबत नेमून दिलेल्या झोपडपटी भागात दररोज फिरावे लागते हि वस्तुस्थिती आहे. करीता बिएसयुपी विभागातील कंत्राटी तत्वावरील कनिष्ट अभियंता यांना इंधन वाहनाच्या खर्चापोटी त्यांच्या वेतनासोबत प्रतिमहा ठराविक रक्कम रु.१०००/- देणे बाबत.

**गफारखान** बिएसयुपी योजने अंतर्गत ज्या नागरीकांना स्वत: घराचे बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्याना दोन-दोन महिणे चकरा मारुनही देयकाची अदाई करण्यात येत नाही .गरीब लोक आहे त्यांना वेळेवर देयकाची अदाई होत नसल्यामूळे अडचणीला सामोरे जावे लागत आहे. याप्रकरणी चौकशी करण्यात यावी.

**बाळासाहेब देशमूख** श्री गफारखान यांनी जे सांगितलेले आहे ते बरोबर आहे.दोन दोन महिणे त्यांचे घराचे बाधकामाची देयके देण्यात येत नाही. अभियंते वेळेवर मोजमाप घेत नाही. वेळेवर बिल तयार करीत नाही गरीब नागरीकांना महानगरपालिकेत सारख्या चकरा माराव्या लागत आहे.माझ्या प्रभागात सर्वात अधिक घराची बांधकामे झालेली आहे परतू त्यांना नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात येत नाही.माझी विनंती आहे की. मंजुर निधीतून रस्ते.नाल्या.पाणी मलनिस्सारण विद्युत व्यवस्था ई. कामे त्वरीत चालू करुन नागरीकाना नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात याव्यात.

**अंजली गायकवाड** कंत्राटी तत्वावरील इंजिनियर कोण कोण आहेत व ते कधी किती वेळा पाहणी करतात ते सांगावे व त्यांची पाहणी करतांना जून्या साईडवर त्यांची नियुक्ती आहे का नाहीप्रशासनाला मला हे विचारावयाचे आहे की नविन घरकुलांचे काम चालू आहे तिथेच तुम्ही लक्ष केंद्रीत करणर का जून्या अर्धवट ठेवण्यात आलेल्या कामाबध्दलचे धोरण पुढे काय आहे आणि मा.साहेबानी दलित वस्ती अंतर्गत होणा-या कामाबदलची माहिती संबंधित अधिका-यांनी सांगावी मा.महापौर साहेब नगरसेवक म्हणून आम्ही आतापर्यत आपापल्या प्रभागात काहीही सुविधा देवू शकलेले नाही नाल्या,रस्ते.नळ लाईन नादुरुस्त ड्रेनेजचे चेंबर्स तुटक तुटक पाणी पुरवठा यासारख्या अनेक छोटया मोठया समस्या जशास तसे प्रभागात नविन प्रगतीचे काहीतरी कामे तर नाहीतच पण जुनी कामे पण रखडत आहेत त्यामूळे नागरीकांत उदासिनता वाढत आहे.

**महापौर** ज्या ज्या भागात बिएसयपुी योजने अंतर्गत घराची बांधकामे चालू आहे त्या भागाचा सर्व्हे करुन त्या ठिकाणी कामे सुरु झालेली नाही ती सुरु करण्यात यावी जी कामे अर्धवट आहेत ती पुर्ण करण्यात यावी

**रजिया बेगम** ७-८ महिण्यापुर्वी माझ्या प्रभागात मलनिस्सारण लाईन टाकण्यात आलेली आहे परतु घराचे ड्रेनेज कनेक्शन देण्यात आलेले नाही इतर नागरी सुविधाची कामेही ७-८ महिण्यापासुन बंद आहे या संदर्भात मी वारंवार अभियंत्याकडे तक्रार केलेली आहे .

**महापौर** नई आबादी भागात विकासाची कामे करण्यात येणार आहे किंवा नाही. मलनिस्सारण लाईनला कनेक्शन का देण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** बिएसयुपी योजनेच्या कामाचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविण्यात यावी.

**महापौर** बिएसयुपी विभागातील कंत्राटी तत्वावरील कनिष्ट अभियंता यांना इंधन वाहनाच्या खर्चापोटी त्यांच्या वेतनासोबत प्रतिमहा ठराविक रक्कम रु.१०००/- देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १८८** **ठ रा व**

बिएसयुपी विभागातील प्रतिमहा एकत्रित वेतनावरील कनिष्ट अभियंता यांनी त्यांच्याकडे विविध झोन निहाय झोपडपट्टी भागातील घरकुलांचे कामाबाबत नियुक्ती केली असून त्यानुसार त्यांना सदर झोपडपट्टी भागामधील घरकुल बांधकाम व मुलभूत सुविधांचे कामाची पाहणी तसेच लाभार्थ्याची तक्रारीचे निवारणासाठी विविध भागात फिरावे लागत असल्यामुळे ते वापरात असलेल्या वाहनांचा इंधन खर्च देण्याची विनंती केली आहे. याबाबत बिएसयुपी विभागात कार्यरत कनिष्ट अभियंता यांची प्रतिमहा रु.१०,०००/-एकत्रित वेतनावर नियुक्ती असून त्यांना झोपडपट्टी निहाय घरकुल बांधकाम नियंत्रणाबाबत नेमून दिलेल्या झोपडपटी भागात दररोज फिरावे लागते हि वस्तुस्थिती आहे. करीता बिएसयुपी विभागातील कंत्राटी तत्वावरील कनिष्ट अभियंता यांना इंधन वाहनाच्या खर्चापोटी त्यांच्या वेतनासोबत प्रतिमहा ठराविक रक्कम रु.१०००/- देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम राबविण्याबाबत दि.५ डिसेंबर२०१३ जा.क्र.राआसे/एनयूएचएम/मंजुर ठराव/६८४३५/२०१३ मा.आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक राष्ट्रीय ग्रामीण अरोग्य महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून आलेल्या पत्रानूसार त्यांनी सालसन २०१३-२०१४ पासून पुढे सदरील अभियान राबविण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यामध्ये खालील पदे करार तत्वावर भरण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिकारी | ८ |
| २) | इपीडेमॉलॉजिस्ट | १ |
| ३) | अकाऊट मॅनेजर | १ |
| ४) | डाटा मॅनेजर | १ |
| ५) | पब्लिक हेल्थ मॅनेजर | ४ |
| ६) | स्टाफ नर्स | १२ |
| ७) | मिश्रक | ४ |
| ८) | एल.एच.व्हि. | ४ |
| ९) | परिचारीका | ३८ |
| १०) | लेखापाल | ४ |
| ११) | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४ |
| १२) | शिपाई | ४ |
| १३) | लिंक वर्कर | ३५ |

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शहरी आरोग्य कार्यक्रम राबविण्यासाठी सालसन २०१३-२०१४ साठी रुपये ५४८.४४ लक्ष मागणी केली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत ४ बाहयरुग्ण दवाखान्याची स्थापना करणे तसेच कार्यरत असलेले बाहयरुग्ण दवाखाने अद्यावत करणे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच बायसंपर्क लसीकरण सत्राचे बळकटीकरण करणे, गरोदर मातांची तपासणी, कुटूंब कल्याण ई. कार्यक्रम मनपा क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रात शहरी आरोग्य अभियान राबविण्यासाठी २०१३ मा. आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण अभियान महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या नियम व अटी नुसार मनुष्यबळाची नियुक्ती करावयाची आहे. करीता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यासाठी सदरील ठराव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा.

**शेर अली** अल्पसंख्याकाकरीता हैदरबाग येथे महानगरपालिकेने दिड कोटी रुपये खर्च करुन दवाखान्याची इमारत बांधलेली असून या सदरील इमारतीत शासनाचे वतीने दवाखाना सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे परंतु आज पर्यत दवाखाना सुरु करण्यात आलेला नाही.शासन दवाखाना सुरु

करीत नसेल तर महानगरपालिकेमार्फत दवाखाना सुरु करण्यात यावा अशी आमची मागणी आहे. सध्या ही इमारत बेवारस पडली असून इमारतीचे बाजूच्या जागेस कोंडवाडयाचे स्वरुप आलेले आहे. डिलेव्हरीचे पेंशट या दवाखान्यात आल्यानतर त्यांना ॲडमिट करुन न घेता दुस-या दवाखान्यात पाठविण्यात येत आहे. माझी विनंती आहे की सदरील दवाखाना महानगरपालिके मार्फत चालवावा जेणे् करुन नागरीकांना चांगल्या प्रकारच्या वैद्यकिय सुविधा उपलब्ध्द होवू शकतील.

**सरजितसिंध गिल** केंद्र शासनाने विशेष बाब म्हणून शहरी आरोग्य कार्यक्रम राबविण्यासाठी नांदेड शहराची निवड करुन त्यासाठी कोटयावधी रुपयाचा निधी उपलब्ध्दकरुन दिला त्याबध्दल मी देशांचे पंतप्रधान डॉ.श्री मनमोहनसिंघजी युपीअेच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण ,आमचे नेते श्री अशोकरावजी चव्हाण यांचे अभिंनदन करतो.तसेच अबचलनगर भागात बाबा शेख फरीद डोळयाचे दवाखाना सुरु करण्यासाठी महासभेने मान्यता दिलेली असल्यामूळे सहा महिण्यात दवाखाना सुरु करण्यात यावा असे मी आयुक्तांना विनंती. करतो.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री सरजितसिंघ गिल यांनी जी सुचना केली आहे त्यास माझे अनुमोदन आहे.अबचलनगर भागात लवकरात लवकर दवाखाना सुरु करण्यात यावा.

**महापौर** गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत हैदरबाग येथे दिड कोटी खर्च करुन दवाखान्याची इमारत बांधण्यात आली असून सदरील इमारतीत शासनाच्यावतीने दवाखाना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली परतु शासनाने अद्याप दवाखाना सुरु केलेला नाही . जर शासन दवाखाना चालवित नसेल तर तो महानगरपालिकेमार्फत चालविण्यासाठी आयुक्तांनी निर्णय ध्यावा. तसेच अबचलनगर भागातही बाबा शेख फरीद डोळयाचा दवाखाना सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे हाही दवाखाना लवकात लवकर सुरु करण्याची कार्यवाही करावी.

**आयुक्त** केंद्र शासनाने शहरी आरोग्य कार्यकम राबविण्यासाठी नांदेड शहराची निवड केलेली आहे त्याबध्दल केंद्र शासनाचे अभिनंदन करण्यात येते.शहरात आरोग्य कार्यक्रम राबाविण्यासाठी रुपये ५४८.४४ लक्षाचा प्रकल्प आराखडा तयार करुन केंद्र शासनास सादर केला होता तो केंद्र शासनाने कालच मंजूर केलेला आहे. या कार्यक्रमा अंतर्गत ४ बाहयरुग्ण दवाखान्याची स्थापना करणे तसेच कार्यरत असलेले बाहयरुग्ण दवाखाने अद्यावत करणे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच बायसंपर्क लसीकरण सत्राचे बळकटीकरण करणे, गरोदर मातांची तपासणी, कुटूंब कल्याण ई. कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावास मान्यता दिली तर त्वरीत वैद्यकिय अधिकारी,नर्सेस ई.तांत्रिक कर्मचा-याच्या नेमणूका करुन आरोग्य कार्यक्रम राबविण्यास प्रशासनास सोईस्कर होईल. गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत हैदरबाग भागात दवाखान्याकरीता इमारत बांधण्यात आली होती. सदर इमारतीत दवाखाना सुरु करण्यासाठी शासनास विनंती करण्यात आली होती या संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा आरोग्याधिकारी महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकिय अधिकारी यांची बैठक घेवून शासनामार्फत किंवा शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमा अंतर्गत दवाखाना सुर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**शेर अली** डॉक्टर लापरवाही करीत आहेत .डिलेव्हरीचे पेशंट आल्यानंतर डॉक्टरांना फोन करुन बोलाविण्यात येते परंतु फोन करुन डॉक्टर येत नाही.डिलेव्हरी पेशंट करीता दवाखान्यात डॉक्टरांची २४ तासा करीता डयुटी लावावयास पाहिजे.जून्या नांदेड भागातील महिलाकरीता एक मॅटर्निटी केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा आरोग्य अधिकारी यांची बैठक घेण्यात यावी. शासनामार्फत दवाखाना चालविणे शक्य नसेल तर महानगरपालिकेकडून किंवा सेवाभावी संस्थे मार्फत दवाखाना चालविण्याचा निर्णय धेण्यात यावा.

**महापौर** स. सदस्य,श्री शेर अली यांनी पुढील सभेत सविस्तर प्रस्ताव द्यावा त्यावर सभागृह निर्णय घेईल. नांदेड वाघाळाशहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम राबविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत करण्यात येतो.

**ठराव क्र.१८९** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम राबविण्याबाबत दि.५ डिसेंबर२०१३ जा.क्र.राआसे/एनयूएचएम/मंजुर ठराव/६८४३५/२०१३ मा.आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक राष्ट्रीय ग्रामीण अरोग्य महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून आलेल्या पत्रानूसार त्यांनी सालसन २०१३-२०१४ पासून पुढे सदरील अभियान राबविण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यामध्ये खालील पदे करार तत्वावर भरण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिकारी | ८ |
| २) | इपीडेमॉलॉजिस्ट | १ |
| ३) | अकाऊट मॅनेजर | १ |
| ४) | डाटा मॅनेजर | १ |

| | | |
|---|---|---|
| ५) | पब्लिक हेल्थ मॅनेजर | ४ |
| ६) | स्टाफ नर्स | १२ |
| ७) | मिश्रक | ४ |
| ८) | एल.एच.व्हि. | ४ |
| ९) | परिचारीका | ३८ |
| १०) | लेखापाल | ४ |
| ११) | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४ |
| १२) | शिपाई | ४ |
| १३) | लिंक वर्कर | ३५ |

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शहरी आरोग्य कार्यक्रम राबविण्यासाठी सालसन २०१३-२०१४ साठी रुपये ५४८.४४ लक्ष मागणी केली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत ४ बाहयरुग्ण दवाखान्याची स्थापना करणे तसेच कार्यरत असलेले बाहयरुग्ण दवाखाने अद्यावत करणे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच बायसंपर्क लसीकरण सत्राचे बळकटीकरण करणे, गरोदर मातांची तपासणी, कुटूंब कल्याण ई. कार्यक्रम मनपा क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रात शहरी आरोग्य अभियान राबविण्यासाठी २०१३ मा. आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण अभियान महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या नियम व अटी नुसार मनुष्यबळाची नियुक्ती करावयाची आहे. करीता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ५ :-**

नांवाशमनपा हद्यीतील हैदरबाग दवाखाना परीसरात पावसाचे पाणी साचुन आहे. सदर भाग हा या परीसरातील इतर भागापेक्षा अत्यंत सखल असल्यामुळे व येथुन पाण्याचा विसर्ग, निचरा होण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग नाही, कारण १) पश्चिमेस रोड नं.२४ २) दक्षिणेस बाफना टी पॉईट ते देगलुर नाका (हैद्राबाद) रोड ३) उत्तरेस रेल्वे ट्रॅक व मालटेकडी रेल्वे स्टेशन ४) पुर्वेस रोड नं.९ ई. चे बांधकाम झाल्यामुळे कापुस व केळी संशोधन केंद्राच्या परीसरातील पाणी, ईस्लाम पुरा, गुलजार बाग, गुलशन बाग, ममता कॉलनी, देवीनगर, हैदरबाग-१) व हैदरबाग-२) या भागातील पावसाचे व नाल्यांचे संपुर्ण पाणी रोड नं.९ लगत तळयाप्रमाणे साचुन राहते. या भागात नागरीकांच्या ईमारतींचे बांधकाम झाल्यामुळे जवळ पास ४-५ वर्ग कि.मी. सखल भागातील नैसर्गीक पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याचा नैसर्गीक मार्ग बंद झालेला आहे. त्यामुळे या भागात दर वर्षी जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोंबर या महिन्यात तळयासारखे पाणी साचुन राहते. हैदरबाग दवाखाना, पाण्याची टाकी, शाळा याच भागात येत असल्यामुळे येथे पावसाचे पाणी तुडुंब भरुन आहे. सदर इमारतीचा पाया (फौंडेशन) साधारणतः २.०० ते.२.५० मी. खोल आहे. परंतु येथे काळया मातीची खोली सुमारे ८.०० ते १०.०० मी. आहे. त्यामुळे सहाजीकच पाण्याचा संपर्क फौंडेशन खाली येऊन इमारतीस धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. वॉटर लॉगींग मुळे Unequal settlement of the soil, foundation होते. तसेच Tilting action of the foundation मुळे इमारतीस Bending moment, shear forces, निर्माण होऊन ईमारतींच्या slab, walls, colums, beams etc. structures ना धोका पोहचण्याची शक्यता फेटाळता येत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी जमणाऱ्या पावसाच्या पाण्याचा कायमचा निचरा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पुर्वी खुबा मस्जिद जवळील उत्तरेकडील दुसऱ्या गल्लीतुन pole no.५७२/११ येथील रस्त्याच्या खालुन दोन पाईप कलव्हर्ट होता, त्यामुळे सदर ठिकाणचे नैसर्गीक पावसाचे पाणी त्या कलव्हर्ट मधुन pole no.५७२/११ ते pole no,५७२/२० पर्यत नाल्याच्या स्वरुपात वाहात जाऊन पुढे पाकीजा नगर नाल्यास मिळत असे, परंतु रोड नं. ९ चे जेएनएनयुआरएम च्या नगरोत्थान अंतर्गत रुंदीकरण झाल्यामुळे सदर पाईप कलव्हर्ट रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी दबल्या गेले व ब्लॉक झाले, त्यामुळे सध्या येथुन पावसाचे पाणी वाहुन जात नाही. तसेच त्याच ठिकाणी रस्त्याच्या डाऊन स्ट्रीम (पुर्व) साईडला रस्त्याची उंची वाढली व नालीची रुंदी कमी झाली.

रोड नं.९ लगत (पश्चिमेस) असलेल्या नालीचा इनव्हर्ट लेवल हा हैदरबाग पाण्याच्या टाकी जवळ असलेल्या प्रत्यक्ष जमीन पातळी पेक्षा ०.६० मी. ते ०.७५ मी. ने उंच आहे. सध्या या नालीस ४-५ ठिकाणी मोठे छीद्र पाडुन सदर ठिकाणी साचलेल्या ४-५ फुट पाण्याचा निचरा करण्यात आला परंतु अजुन २.०० फुट पाणी साचुन आहे. हेच पाणी खुबा मस्जिद जवळ ३-४ फुट आहे, त्यामुळे नैसर्गीक पाण्याच्या व्हॅली आकारावर पुनःबॉक्स कलव्हर्ट चे बांधकाम करुन पाणी पुर्वीच्या च पारंपारीक गल्लीतुन under ground structure ने काढुन ते बागवान कॉलनी, प्लॉट न.६२ पासुन च्या मिल्लत नगर, पाकीजा नगर नाल्यात सोडणे अत्यंत गरजेचे आहे. सदर कामास अंदाजीत ३५-४० लक्ष रुपयांचा निधी अवश्यक आहे.

सदर काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने व अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये तरतुद ठेवण्यात आली नसल्याने ``**सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे**`` या नावाने एक नविन शिर्षक तयार करुन अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये ``**शिवाजी नगर औद्योगिक वसाहत अंतर्गत रस्ते विकसीत करणे**`` या शिर्षाखाली ठेवण्यात आलेली तरतुद रु. १.०० कोटी मधुन रु. ४०.०० लक्ष उक्त शिर्षाखाली ठेवणेस व सदर कामासाठी लागणारा खर्च रु. ४०.०० लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**विजय येवनकर** शिवाजीनगर औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्ते अत्यंत खराब झालेले असल्यामूळे यास्त्याची दुरुस्ती करणे करीता अंदाजपत्रका आपण तरतूद केलेली आहे त्यामूळे अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनूसार या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी ही तरतूद इतर कामासाठी वळती करण्यात येवू नये सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी ``शहरात विविध ठिकाणी बस थाबे`` शिर्षकातील तरतूद वळती करण्यात यावी अशी विनंती आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** बीओटी तत्वावर बस थांबे उभारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला असल्यामूळे श्री येवनकर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री येवनकर यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे शहरात विविध ठिकाणी बस थाबे या शिर्षातील रु.४०.०० लक्षाची तरतूद कमी करुन ती सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे या नविन शिर्षात तरतूद करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १९०** **ठ रा व**

नांवाशमनपा हद्दीतील हैदरबाग दवाखाना परीसरात पावसाचे पाणी साचुन आहे. सदर भाग हा या परीसरातील इतर भागापेक्षा अत्यंत सखल असल्यामुळे व येथुन पाण्याचा विसर्ग, निचरा होण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग नाही, कारण १) पश्चिमेस रोड नं.२४ २) दक्षिणेस बाफना टी पॉईट ते देगलुर नाका (हैद्राबाद) रोड ३) उत्तरेस रेल्वे ट्रॅक व मालटेकडी रेल्वे स्टेशन ४) पुर्वेस रोड नं.९ ई. चे बांधकाम झाल्यामुळे कापुस व केळी संशोधन केंद्राच्या परीसरातील पाणी, ईस्लाम पुरा, गुलजार बाग, गुलशन बाग, ममता कॉलनी, देवीनगर, हैदरबाग-१) व हैदरबाग-२) या भागातील पावसाचे व नाल्यांचे संपुर्ण पाणी रोड नं.९ लगत तळयाप्रमाणे साचुन राहते. या भागात नागरीकांच्या ईमारतींचे बांधकाम झाल्यामुळे जवळ पास ४-५ वर्ग कि.मी. सखल भागातील नैसर्गीक पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याचा नैसर्गीक मार्ग बंद झालेला आहे. त्यामुळे या भागात दर वर्षी जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोंबर या महिन्यात तळयासारखे पाणी साचुन राहते. हैदरबाग दवाखाना, पाण्याची टाकी, शाळा याच भागात येत असल्यामुळे येथे पावसाचे पाणी तुडुंब भरुन आहे. सदर इमारतीचा पाया (फौंडेशन) साधारणतः २.०० ते.२.५० मी. खोल आहे. परंतु येथे काळया मातीची खोली सुमारे ८.०० ते १०.०० मी. आहे. त्यामुळे सहाजीकच पाण्याचा संपर्क फौंडेशन खाली येऊन इमारतीस धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. वॉटर लॉगींग मुळे Unequal settlement of the soil, foundation होते. तसेच Tilting action of the foundation मुळे इमारतीस Bending moment, shear forces, निर्माण होऊन ईमारतींच्या slab, walls, colums, beams etc. structures ना धोका पोहचण्याची शक्यता फेटाळता येत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी जमणाऱ्या पावसाच्या पाण्याचा कायमचा निचरा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पुर्वी खुबा मस्जिद जवळील उत्तरेकडील दुसऱ्या गल्लीतुन pole no.५७२/११ येथील रस्त्याच्या खालुन दोन पाईप कलव्हर्ट होता, त्यामुळे सदर ठिकाणचे नैसर्गीक पावसाचे पाणी त्या कलव्हर्ट मधुन pole no.५७२/११ ते pole no,५७२/२० पर्यत नाल्याच्या स्वरुपात वाहात जाऊन पुढे पाकीजा नगर नाल्यास मिळत असे, परंतु रोड नं. ९ चे जेएनएनयुआरएम च्या नगरोत्थान अंतर्गत रुंदीकरण झाल्यामुळे सदर पाईप कलव्हर्ट रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी दबल्या गेले व ब्लॉक झाले, त्यामुळे सध्या येथुन पावसाचे पाणी वाहुन जात नाही. तसेच त्याच ठिकाणी रस्त्याच्या डाऊन स्ट्रीम (पुर्व) साईडला रस्त्याची उंची वाढली व नालीची रुंदी कमी झाली.

रोड नं.९ लगत (पश्चिमेस) असलेल्या नालीचा इनव्हर्ट लेवल हा हैदरबाग पाण्याच्या टाकी जवळ असलेल्या प्रत्यक्ष जमीन पातळी पेक्षा ०.६० मी. ते ०.७५ मी. ने उंच आहे. सध्या या नालीस ४-५ ठिकाणी मोठे छीद्र पाडुन सदर ठिकाणी साचलेल्या ४-५ फुट पाण्याचा निचरा करण्यात आला परंतु अजुन २.०० फुट पाणी साचुन आहे. हेच पाणी खुबा मस्जिद जवळ ३-४ फुट आहे, त्यामुळे नैसर्गीक पाण्याच्या व्हॅली आकारावर पुनःबॉक्स कलव्हर्ट चे बांधकाम करुन
पाणी पुर्वीच्या च पारंपारीक गल्लीतुन under ground structure ने काढुन ते बागवान कॉलनी, प्लॉट न.६२ पासुन च्या मिल्लत नगर, पाकीजा नगर नाल्यात सोडणे अत्यंत गरजेचे आहे. सदर कामास अंदाजीत ३५-४० लक्ष रुपयांचा निधी अवश्यक आहे.

सदर काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने व अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये तरतुद ठेवण्यात आली नसल्याने ``**सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे**`` या नावाने एक नविन शिर्षक तयार करुन अंदाजपत्रक सालसन २०१३-१४ मध्ये ``**शहरात विविध ठिकाणी बस थाबे**`` या शिर्षाखाली ठेवण्यात आलेली रु. ४०.०० लक्षाची तरतूद कमी करुन कमी करण्यात आलेली रु. ४०.०० लक्ष ``**सखल भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणे**``शिर्षाखाली तरतूद करण्यास प्रशासकीय मान्यता तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. ४०.०० लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मान्यता हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ६ :-**

वैद्यकीय महाविद्यालय व परिसर, विष्णूपुरी येथून निर्माण होणाऱ्या मलप्रवाहाची दक्षिण नांदेड च्या महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेशी जोडणी करण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय यांचे वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त झालेला आहे.

उक्त प्राप्त प्रस्तावानुसार वैद्यकिय महाविद्यालय व परिसर, विष्णूपुरी येथून निर्माण होणारा दैनंदिन मलप्रवाह २.४३ द.ल.ली. एवढा अपेक्षित असून. महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेस जोडणी करणे तांत्रिक दृष्टया शक्य असल्यामुळे पुढी अटी व शुल्क रचनेवर आधारीत परवानगी देण्यास हरकत नाही.

**अटी व शुल्क रचना :-**

१. महापालिकेच्या मलनिस्सारण जोडणीसाठी ठराविक शुल्क (Fixed Connection Charge* रू. १.०० लक्ष असतील.
२. लाभार्थ्यां कडील निर्माण होणाऱ्या मलप्रवाहानुसार प्रती द.ल.ली. मलप्रवाहास प्रतीवर्ष रू. ९.४६ लक्ष एवढे शुल्क लाभार्थ्याने महापालिकेस द्यावेत. लाभर्थ्याने कळविल्यानूसार निर्माण होणारा मलप्रवाह २.४३ द.ल.ली. असेल व त्यासाठी वरील दराने रू. २३.०० लक्ष वार्षीक शुल्क पडेल. तसेच वार्षिक मलप्रवाहचे परिमाण वाढल्यास त्याप्रमाणे शुल्क आकारले जाईल.
३. वर नमुद केलेला प्रती द.ल.ली. प्रती वर्ष दरामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना राहील.
४. कोणत्याही प्रकारचा जैवीक कचरा मलप्रवाहात आढळून आल्यास मलनिस्सारण जोडण रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना राहील.
५. कोणत्याही प्रकारचा जैविक/घनकचरा मलप्रवाहीसोबत योणार नाही याची जवाबदारी लाभर्थ्यावर राहील.
६. महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेच्या ठरवून दिलेल्या चेंबरशी जोडणी महापालिका अभियंत्याच्या देखरेखी खालीच करावी लागेल.
७. महापालिकेच्या चेंबरशी जोडणी पूर्वी असलेल्या संपुर्ण व्यवस्थेची जवाबदारी लाभार्थ्यावर राहील.

उपरोक्त अटी व शुल्क संरचने नुसार वैद्यकिय महाविद्यालयास मलनिस्सारण जोडणीची परवानगी देणेच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर निर्णयास्तव सादर.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १९१** **ठ रा व**

वैद्यकीय महाविद्यालय व परिसर, विष्णूपुरी येथून निर्माण होणाऱ्या मलप्रवाहाची दक्षिण नांदेडच्या महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेशी जोडणी करण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय यांचे वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त झालेला आहे.

उक्त प्राप्त प्रस्तावानुसार वैद्यकिय महाविद्यालय व परिसर, विष्णूपुरी येथून निर्माण होणारा दैनंदिन मलप्रवाह २.४३ द.ल.ली. एवढा अपेक्षित असून. महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेस जोडणी करणे तांत्रिक दृष्टया शक्य असल्यामुळे खालील अटी व शुल्क रचनेवर आधारीत वैद्यकिय महाविद्यालयास मलनिस्सारण जोडणीची परवानगी देण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**अटी व शुल्क रचना :-**

१) महापालिकेच्या मलनिस्सारण जोडणीसाठी ठराविक शुल्क (Fixed Connection Charge* रू. १.०० लक्ष असतील.
२) लाभार्थ्यां कडील निर्माण होणाऱ्या मलप्रवाहानुसार प्रती द.ल.ली. मलप्रवाहास प्रतीवर्ष रू. ९.४६ लक्ष एवढे शुल्क लाभार्थ्याने महापालिकेस द्यावेत. लाभर्थ्याने कळविल्यानूसार निर्माण होणारा मलप्रवाह २.४३ द.ल.ली. असेल व त्यासाठी वरील दराने रू. २३.०० लक्ष वार्षीक शुल्क पडेल. तसेच वार्षिक मलप्रवाहचे परिमाण वाढल्यास त्याप्रमाणे शुल्क आकारले जाईल.
३) वर नमुद केलेला प्रती द.ल.ली. प्रती वर्ष दरामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना राहील.
४) कोणत्याही प्रकारचा जैवीक कचरा मलप्रवाहात आढळून आल्यास मलनिस्सारण जोडण रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना राहील.
५) कोणत्याही प्रकारचा जैविक/घनकचरा मलप्रवाहीसोबत योणार नाही याची जवाबदारी लाभर्थ्यावर राहील.
६) महापालिकेच्या मलनिस्सारण व्यवस्थेच्या ठरवून दिलेल्या चेंबरशी जोडणी महापालिका अभियंत्याच्या देखरेखी खालीच करावी लागेल.
७) महापालिकेच्या चेंबरशी जोडणी पूर्वी असलेल्या संपुर्ण व्यवस्थेची जवाबदारी लाभार्थ्यावर राहील.

**विषय क्र.७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभा ठराव क्र.९२ दि.२२.८.२०१३ वाडी (ब्रु) या गावांसाठी महानगरपालिका पाणी पुरवठा करणेसाठी प्रतिहजार लिटर रु.१२/- प्रमाणे सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला होता.

त्यानूसार १२/-रु. प्रति हजार लिटर दर हा जास्त असल्यामुळे त्यांची फेर पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांनी विंनती केली होती त्याबाबत मा.पालकमंत्री नांदेड यांचे सोबत झालेल्या बैठकीत १२/- प्रति हजार लिटर च्या दरानुसार महानगरपालिकेतर्फे सांगण्यात आले होते.

तदनंतर पुनश्च दि.३.१२.२०१२ च्या मा.पालकमंत्री यांचे समावेत चर्चा झाली त्याप्रमाणे प्रति हजारी पाण्याचा दर रु.७.१० प्रमाणे संमती द्यावी म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचे पत्र क्र.३४०८/१२ दि.६.१२.२०१२ अन्वये कळविले असता महानगरपालिकेने शुध्द पाणी पुरवठयाचा उत्पादन खर्च काढला त्यामध्ये cpheeo ने नियत केलेल्या पाणी हानीचा संदर्भ देवून २५% Looses धरुन अभिप्रेत आहेत असे कळविण्यात आले असून त्यानूसार या कार्यालया मार्फत कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नांदेड यांना दि.८.१.२०१३ च्या पत्राच्या अनुषंगाने शुध्द पाण्याचा दर (ना नफा ना तोटा) दर रु.७.२५ प्रति किलो लिटर येत असल्याचे कळविले होते त्या अनुषंगाने उपरोक्त दर मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेमसोर सादर करुन भविष्यात विविध घटकांच्या
दरात वाढ झाल्यास त्याप्रमाणे पाणी दरात वाढ करावी लागेल या दृष्टीकोनातून खालील व अटी व शर्तीनुसार उक्त क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणे योग्य वाटते.

१) ग्रामपंचायतीने संप मधून आवश्यक यंत्रणा स्वखर्चाने उभारुन (जसे इनलेट,पंप,पंपगृह,स्वतंत्र विद्युत कनेक्शन, स्वतंत्र मिटर, स्वतःचा कर्मचारी वर्ग ई.) पाणी स्वखर्चाने उचल करुन घ्यावे लागेल.
२) प्रत्यक्ष पाणी - उचल मिटरव्दारे मोजणी करुन त्यानूसार दरमहा देयक अदा करावे लागेल. पंपानुतर लगेचच पाणी मिटर बसविण्यात यावे लागेल.
३) शुध्द पाण्याचा महानगरपालिकेने ठरविलेला दर रु.७.२५ प्रति १००० लिटर याप्रमाणे राहिल. याच प्रमाणे भविष्यकाळात महानगरपालिका सभेने दर सुधारीत केल्यास तो वाढीव दर लागू राहिल.
४) प्रत्यक्ष देयकानूसार दरमहा ठरवून दिलेल्या वेळेत ग्रामपंचायतने देयके भरणा न केल्यास जिल्हा परिषद प्रशासन ग्राम पंचायत अनुदानातून वळते करुन महानगरपालिकेस सदरील पाणी उचल केल्याची रक्कम उपलब्ध्द करुन देईल. यासाठीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे हमीपत्र महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहिल.
५) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर ग्रामपंचायतने महानगरपालिके समवेत उपरोक्त अटी व शर्ती नमूद असणारा करारनामा करुन द्यावा लागेल.

करीता पूर्वीच्याच प्रस्तावात सुधारणा करणेसाठी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर पुरवठा

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९२** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभा ठराव क्र.९२ दि.२२.८.२०१३ वाडी (ब्रू) या गावांसाठी महानगरपालिका पाणी पुरवठा करणेसाठी प्रतिहजार लिटर रु.१२/- प्रमाणे सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला होता.त्यानूसार १२/-रु. प्रति हजार लिटर दर हा जास्त असल्यामुळे त्यांची फेर पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांनी विंनती केली होती, महानगरपालिकेने शुध्द पाणी पुरवठयाचा उत्पादन खर्च काढला त्यामध्ये cpheeo ने नियत केलेल्या पाणी हानीचा संदर्भ देवून २५% Looses धरुन शुध्द पाण्याचा दर (ना नफा ना तोटा धर्तीवर ) दर रु.७.२५ प्रति किलो लिटर येत असल्याचे कळविले आलेले आहे. करीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या अधिका-यानी केलेल्या विनंती केल्या नुसार नांवाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.९२ दि.२२.८.२०१३ मध्ये प्रतिहजार लिटर रु.१२/-या दराऐवजी रु.७.२५ प्रति किलो लिटर यादराने खालील व अटी व शर्तीनुसार उक्त क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करण्यात यावा अशी दुरुस्ती करण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

१) ग्रामपंचायतीने संप मधून आवश्यक यंत्रणा स्वखर्चाने उभारुन (जसे इनलेट,पंप,पंपगृह,स्वतंत्र विद्युत कनेक्शन, स्वतंत्र मिटर, स्वतःचा कर्मचारी वर्ग ई.) पाणी स्वखर्चाने उचल करुन घ्यावे लागेल.
२) प्रत्यक्ष पाणी - उचल मिटरव्दारे मोजणी करुन त्यानूसार दरमहा देयक अदा करावे लागेल. पंपानुतर लगेचच पाणी मिटर बसविण्यात यावे लागेल.
३) शुध्द पाण्याचा महानगरपालिकेने ठरविलेला दर रु.७.२५ प्रति १००० लिटर याप्रमाणे राहिल. याच प्रमाणे भविष्यकाळात महानगरपालिका सभेने दर सुधारीत केल्यास तो वाढीव दर लागू राहिल.
४) प्रत्यक्ष देयकानूसार दरमहा ठरवून दिलेल्या वेळेत ग्रामपंचायतने देयके भरणा न केल्यास जिल्हा परिषद प्रशासन ग्राम पंचायत अनुदानातून वळते करुन महानगरपालिकेस सदरील पाणी उचल केल्याची रक्कम उपलब्ध्द करुन देईल. यासाठीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे हमीपत्र महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहिल.
५) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर ग्रामपंचायतने महानगरपालिके समवेत उपरोक्त अटी व शर्ती नमूद असणारा करारनामा करुन द्यावा लागेल.

**-: स. सदस्यांचे प्रस्ताव :-**

**विषय क्र.८ :-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यदीतील बसंतानगर, लक्ष्मी नगर, शिव नगर भागात पाणीपुरवठा व मलनिस्सारण वितरण नलिका टाकणे बाबत.

**सुचक-** स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक-** स. सरजितसिंघ गिल

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सन २०१३-२०१४ व सन २०१४-१५ या वर्षात दलित वस्ती योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार बसतांनगर भागात मलनिस्सारण पाईप लाईन टाकणेकरीता अेस्टीमेट रु. रु.८५,९७,५००/-,लक्ष्मीनगर भागात मलनिस्सारण पाईप लाईन टाकण लाईन टाकण्याकरीता अेस्टीमेट रु.८९,९०,४५०/-लक्ष्मीनगर

भागात पाणी पुरवठा पाईप लाईन टाकणेकरीत ॲंस्टीमेट रु. रु.१९,५१,५८४/- ला प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देवून सदरील कामे प्राधान्याने अनुक्रमांकानूसार घेण्याकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १९३** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सन २०१३-२०१४ व सन २०१४-१५ या वर्षात दलित वस्ती योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार बसंतानगर व लक्ष्मीनगर भागात खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे पाणीपुरवठा व मलनिस्सारण पाईप लाईन टाकण्याची कामे प्राधान्याने अनुक्रमांकानूसार घेण्याकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजपत्रकीय किंमत** |
|---|---|---|
| १ | बसतांनगर भागात मलनिस्सारण पाईप लाईन टाकणे | रु.८५,९७,५००/- |
| २ | लक्ष्मीनगर भागात मलनिस्सारण पाईप लाईन टाकणे | रु.८९,९०,४५०/- |
| ३ | लक्ष्मीनगर भागात पाणी पुरवठा पाईप लाईन टाकणे | रु.१९,५१,५८४/- |

**विषय क्र.९:-** **<u>प्रस्ताव</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबुत करणेसाठी विविध स्त्रोत शोधणे, विविध विकास कामांचे नियोजन करणेसाठी सर्वपक्षीय नियोजन समितीची स्थापना करण्यात यावी. त्यात अनुभवी व अभ्यासू नगरसेवक व अधिकारी यांचा समावेश करावा.

**सुचक-** डॉ. विश्वास बालाजीराव कदम **अनुमोदक-**आनंद शंकरराव चव्हाण

**गफारखान** यासुचकांनी प्रस्तावाचे अनुषंगाने आपली काय अपेक्षा आहे काय भूमिका आहे ती सभागृहात मांडावी.

**विश्वास कदम** महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर शासनाकडून प्रभागातील विकास कामासाठी ,कर्मचा-यांच्या पगारासाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. महानगरपालिकेस मालमत्ता कर, पाणी करापासून एलबीटी पासून मिळणा-या उत्पन्नातूनप्रभागातील विकासाची कामे करावी लागतात,कर्मचा-यांचा पगार करावा लागतो.शहराची लोकसंख्या वाढलेली आहे वस्त्या वाढलेल्या आहेत परंतु महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ झालेली नसल्यामूळे प्रभागात विकासाची कामे होत नाही,कर्मचा-यांचा पगार होत नाही.म्हणून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढविता येईल याचा विचार करण्याकरीता जेष्ठ सदस्यांची व अधिका-याची एक उपसमिती कायम करण्यात यावी

**आनंद चव्हाण** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजन करण्याकरीता जेष्ठ सदस्यांची अधिका-याची एक उपसमिती कायम करण्याचा प्रस्ताव आहे.

**दिपकसिंह रावत** महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मंजुर करतांना स्थायी समिती,व महानगरपालिकेचे सदस्य उत्पन्न वाढीच्या संदर्भात नेहमी सभेत सुचना करतात मात्र या सुचनांची अमलबजावणी होत नाही मग उपसमिती नेमून त्याचा काय फायदा

**सरजितसिंध गिल** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीकरीता यापुर्वीही महापौरांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती कायम करण्यात आली होती ,परंतु या उपसमितीने कोणत्याही प्रकारचा अहवाल दिलेला नाही. करीता उपमहापौरांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ अनुभवी जेष्ठ सदस्य श्री शफि अहेमद कुरेशी. श्री रामनारायणजी काबरा, श्री येवनकर विजय हिराचंद,श्री कदम विश्वास बालाजी, श्री ॲड.बन श्याम वामनराव श्री अल केसरी हसन बिन उबेद,श्री राजेंद्र खंदारे, उपआयुक्त,महसुल.श्री रत्नाकर वाघमारे. उपआयुक्त,विकास,श्री पि.पि.बंकलवाड, लेखाधिकारी.याची एक उपसमिती कायम करण्यात यावी या उपसमितीने महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल याचा अभ्यास करुन आपला अहवाल आयुक्तांना सादर करावा .आयुक्त त्यावर नियमानूसार कार्यवाही करतील.

**दिपकसिंह रावत** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडता त्यास माझे अनुमोदन आहे.

**स.जानी** चालू वर्षाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सभेत ठेवण्यात आले होते त्यावेळी आम्ही उत्पन्न वाढीच्या अनेक सुचना केलेल्या आहेत परंतु त्याची अमलबजावणी होत नाही. महानगरपालिकेने जिल्हा परिषदेच्या बाजूची जागा खाजगी व्यक्तीस लिजवर दिलेली आहे त्यानी या ठिकाणी तीन चार मजली भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधलेले असून त्यातील गाळे २५-३० डिपॉझिट घेवून १०-१५ हजार किराया घेवून इतरांना भाडेपटीवर देत आहे. जर महानगरपालिकेने स्वत: शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम करुन गाळे सुशिक्षित बेरोजगारांना ऑक्शन लिलावाने दिले असते तर महानगरपालिकेस २०-२५ लाख

डिपॉझिट व प्रतिमहा १० ते १५ हजार भाडे मिळू शकले असते. खाजगी व्यक्तीस जागा दिल्यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे ज्याज्या ठिकाणी महानगरपालिकेची मोकळी जागा आहे त्या ठिकाणी भव्य शॉपिंग कॉम्पलेक्स बांधकाम करुन गाळे जाहिर लिलावाने भाडेपटीने दिल्यास महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात उत्पन्न वाढू शकते. याचा विचार करण्यात यावा. ज्या जागा नाममात्र दराने लिजवर दिलेल्या आहेत त्या जागा परत घेण्यात याव्यात तेथे गाळयाचे बांधकाम करुन जाहिर लिलावाने गाळे भाउेपटीवर देण्यात यावे.

**आयुक्त** श्री स.जानी यांनी दुकाने जाहिर लिलावाने भाडेपटीवर देण्याची सुचना केलेली आहे त्यांच्या सुचनेची लवकरच अमलबजावणी करण्यात येइल. महानगरपालिकेने जे नविन शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम केलेले आहे करीत आहेत त्यातील सर्व गाळे जाहिर लिलावाने हर्रास करुन भाडेपटीवर देण्यात येणार आहे.

**सविता कंठेवाड** महानगरपालिकेत स्थायी समिती ही मुख्य कार्यकारीणी समिती असून या समितीस उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून निर्णय घेण्याचे अधिकार आहेत आवश्यक तेथे महानगरपालिकेस उत्पन्न वाढीसाठी उपाय योजना करण्यासाठी महासभेस शिफारस करण्याचेही अधिकार असतांना प्रत्येक विषयाला उपसमिती कायम करण्याची काय आवश्यकता आहे

**महापौर** स.सदस्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून उत्पन्नाचे स्त्रोत सुचविण्याकरीता श्री आनंद चव्हाण उपमहापौर यांचे अध्यक्षतेखाली श्री शफि अहेमद कुरेशी, श्री किशोद यादव ,श्री येवनकर विजय हिराचंद,श्री काबरा रामनारायण रामदेव श्री कदम विश्वास बालाजी, श्री ॲड.बन श्याम वामनराव श्री अल केसरी हसन बिन उबेद,श्री राजेंद्र खंदारे, उपआयुक्त,महसुल.श्री रत्नाकर वाघमारे. उपआयुक्त,विकास,श्री पि.पि.बंकलवाड,मुख्य लेखाधिकारी यांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देण्यात येते या उपसमितीने महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येइ्ल याचा सविस्तर अहवाल आयुंक्तांना सादर करावा.

**ठराव क्र.१९४** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेच्या कामाचा खर्च पाहता उत्पन्नात वाढ करणे महानगरपालिकेस अनिवार्य झालेले आहे. त्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरीता उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना सुचविणे.व उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण करणे.उपमहापौरांच्या अध्यक्षतेखाली यांचे अध्यक्षतेखाली श्री शफि अहेमद कुरेशी, श्री किशोद यादव ,श्री येवनकर विजय हिराचंद,श्री काबरा रामनारायण रामदेव ,श्री कदम विश्वास बालाजी, श्री ॲड.बन श्याम वामनराव श्री अल केसरी हसन बिन उबेद,श्री राजेंद्र खंदारे,उपआयुक्त,महसुल.श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, विकास, श्री पि.पि.बंकलवाड,मुख्य लेखाधिकारी यांची एक उपसमिती कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

या उपसमितीने उत्पन्न वाढविण्यासाठीच्या, खर्च कमी करण्याच्या उपाय योजना व उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण करण्याचा अहवाल तयार करुन आयुक्त, नांवामनपा नांदेड यांना सादर करावा, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१० :-** **<u>प्रस्ताव</u>**

मनपा कर विभागामार्फत शहरातील मलमत्ताधारकांना देण्यात आलेल्या कर आकारणी मागणी नोटीशीमधील अनधिकृत बांधकाम शिर्षकात खुप मोठया प्रमाणात अनधिक्रृत बांधकाम शास्ती लावण्यात आले आहे. नांदेड शहरामध्ये अनधिकृतरित्या होत असलेल्या बांधकामास मनपा प्रशासन देखील अंशतः जबाबदार आहे त्यामुळै शहरातील अनधिकृत बांधकामधारकास त्यांचे बांधकाम अधिकृत करण्याकरीता कसल्याही प्रकारची नोटीस न देता त्यांना थेट शास्ती लावण्यात आलेली आहे. नियमानुसार बांधकाम परवानगी घेवून जास्तीचे बांधकाम केलेल्या मालमत्ताधारकांना त्यांचे बांधकाम हार्डशिप मध्ये आणण्यासाठी आणि अनधिकृत बांधकामधारकांना त्यांची मालमत्ता अधिकृत करण्याची संधी देण्यासाठी त्यांना अगोदर वेगवेगळे नोटीस देण्यात यावी व त्यांनंतरच त्यांच्या मालमत्तेला त्यांन बांधकाम केलेल्या वर्षापासून अनधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात यावी. करिता सदरचा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचकः-** शफी अहेमद कुरेशी **अनुमोदक :-** आनंद शंकरराव चव्हाण

**<u>प्रशासकीय अभिप्राय</u>**

मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ नुसार नांवामनपा हद्दितील दि.४ जानेवारी २००८ नंतर केलेल्या आधिकृत बांधकामांना त्या इमारतीच्या मालमत्ताकराच्या दुप्पट आधिकृत बांधकाम शास्ती लावुन वसुल करण्यात येते आहे. सन २०११-१२ च्या कर आकारणी मध्ये जी नवीन बांधकामे आढळुन आली त्या सर्व इमारतीच्या मालमत्ता कराच्या दुप्प्ट शास्ती लावुन मागणी करण्यात आली आहे. परंतु याबाबत मा. महापौर व सर्व पक्षीय सदस्यांनी जेवढे बांधकाम अनाधिकृत असेल त्या बांधकामांनाच अनाधिकृत शास्ती लावण्याबाबत आदेश काढण्यात आले त्याबबात खाली प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ नुसार अवैध इमारतीवर मालमत्ताकराच्या दुप्पटीइतकी अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्याची तरतुद आहे. ज्या मालमत्ताधारकांना अनाधिकृत बांधकाम शास्ती लागली आहे. त्यांना त्यांच्या फकत अनाधिकृत बांधकामावरच शास्ती लावली. जाईल. परंतु त्यांनी अनाधिकृत बांधकाम शास्तीची रककम वगळुन पुर्ण कराचा भरणा दि.३१ जानेवारी २०१४ पर्यंत करून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे अपिल करणे आवश्यक राहील.

साल सन २०१३-१४ च्या कर मागणी नुसार अनाधिकृत बांधकाम मालमत्ता संख्या एवढी असुन त्यावर लागलेली अनाधिकृत बांधकाम शास्ती रक्कम रू.७,५३,२७,०७२/- इतकी आहे.

शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमीत करण्याकरीता महानगरपालिकेने हार्डशिप प्रीमीयम संदर्भात डीसी रूल तयार केले आहेत त्यानुसार अनाधिकृत बांधकाम धारकांनी अनाधिकृत बांधाकामे नियमीत केल्यानंतर अनाधिकृत बांधकाम शास्ती रद्दत होऊ शकेल. तसेच सन्माननिय सदस्यांनी अनाधिकृत बांधकामास प्रशासनही जबाबदार असल्याने प्रस्तावात नमुद केले आहे. वास्तवीक तसे नाही वस्तुस्थिती ही खालील आकडेवारी वरून स्पष्ट हेईल.

**हार्डशिप प्रिमीयम अंतर्गत प्रकरणे व प्राप्त महसुल**

| अ.क्र. | एकुण दाखल प्रकरणांची संख्या | मंजुर प्रकरणांची संख्या | जमा झालेली प्रिमियम पोटी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १९३ | १४५ | ४,७५,८६,७६९/- |

**अनाधिकृत बांधकाम व त्याविरुध्द केलेली कार्यवाही**

| अनु.क्र. | सालसन | पंचनामा संख्या | म प्रा न र अंतर्गत ५३ व ५४ | एफ आय आर दाखल | अनाधिकृत बांधकाम पाडलेल्या इमारतीची संख्या | हार्ड शिप प्रिमीयम मध्ये दाखल प्रकरणे | हार्ड शिप प्रिमीयम मध्ये मंजुर प्रकरणे | हार्ड शिप प्रिमियम मध्ये प्रलंबीत प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २००८-०९ | १९७ | १९७ | ०९ | ० | ० | ० | ० |
| २. | २००९-१० | ५६१ | ५६१ | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | २०१०-११ | ३२९ | ३२९ | १२ | १ | ० | ० | ० |
| ४. | २०११-१२ | ६३२ | ६३२ | ५४ | ९ | ० | ० | ० |
| ५. | २०१२-१३ | ६३० | ६३० | ०६ | १० | ३७० | ० | ० |
| ६. | २०१३-१४ | ४३१ | ४३१ | ०९ | १३ | ० | ० | ० |
| | | २७८० | २७८० | ९० | ३३ | ३७० | ० | ० |

**शफि अहेमद कुरेशी** नांदेड शहरातील नागरीकांना मालमत्ता कराच्या ज्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत त्या पुर्ण चुकीच्या देण्यात आलेल्या आहे,उपसमितीने सर्वसाधारण सभेस रेडीरेकनर प्रमाणे ०.१५ प्रमाणे फक्त सामान्य कर आकारण्याची शिफारस केली होती.सामान्य कराचा चुकीचा अर्थ लावून शिक्षणकर.वृक्ष कर.अग्नीशमन कर अशा इतर उपकरात पुवीच्या करापेक्षा ३-४ पटीने वाढ करण्यात आलेली आहे ती वाढ सर्वसाधारण सभेची ठरावाची उल्लंघन करणारी आहे असे मी मानतो.ज्या भागात मलनिस्सारण पाईपल लाईनची सुविधा नाही,त्या भागातील नागरीकांनाही मलनिस्सारण कर आकारण्यात आलेला आहे. नविन वस्त्यात कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नसतांनाही त्यांना वाढीव कर आकारण्यात आल्यामूळे त्या भागातील नागरीकांचा महानगरपालिकेवर रोष आहे. ज्या नागरीकांनी बांधकाम परवानगी घेवून मायनर बांधकाम परवानगी विरुध्द बांधकाम केले अशा इमारतीस पुर्ण इमारत अनाधिकृत बाधकाम समजुन दुप्पट कराची आकारणी करण्यात आलेली आहे ही बाब नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द आहे.सारख्याच इमारतीचे मोजमाप करतांना सामान्य कराची आकारणी करतांनाही बिल कलेक्टरकडून खुप चुका झालेल्या आहेत दोन इमारतीचे एक सारखे बांधकामाचे क्षेत्रफळ असतांना समान कर आकारणी न होता वेगवेगळी कर आकारणी करण्यात आलेली आहे त्याची तपासणी करणे आवश्यक आहे.पुनर कर आकरणीच्या प्रस्तावास मान्यता देतांना मागील कराच्या दुप्पट कर आकारल्या जाणार नाही असे सागण्यात आले होते परंतु तसे झालेले नाही नागरीकंना पुर्वीच्या कराच्या तीन ते चार पटीने वाढीव कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतींना शास्ती लावण्यात आलेली आहे परंतु नागरीकाना आपली अनाधिकृत बांधकामे गुठेवारी,हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत नियमित करण्यासाठी संधी द्यावयास पाहिजे,महानगरपालिका हध्दीतील अनाधिकृत बाधकामे नियमित करण्याच्या प्रस्तावावर शासन विचार करीत आहे. करीता सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा मालमत्ताधारकाना अनाधिकृत बांधकामाची जी शास्ती लावण्यात आलेली ती अन्यायकारक असल्यामूळे मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यतची मुदत देण्यात यावी व त्यांनंतर अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीनां मालमत्ता करात शास्ती लावण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावा असा माझा प्रस्ताव आहे.यावर सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**प्रा.ललिता बोकरे** श्री शफि अहेमद कुरेशी यांनी जो प्रस्ताव मांडला तो बरोबर असून त्यास माझे अनुमोदन आहे.ज्या भागात मलनिस्सारणाची सुविधा नसतांनाही त्याभागातील नागरीकंना मलनिस्सारण कराची आकारणी करण्यात आलेली आहे जे चुकीचे आहे. यावर पुर्नर विचार करण्यात यावा.

**अनुजा तेहरा** अनाधिकृत बांधकामावर जी शास्ती लावण्यात आलेली आहे त्याबाबत नागरीक संभ्रमात आहे.श्री शफि अहेमद कुरेशी यांनी सुचविल्याप्रमाणे नागरीकांना अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने अंतर्गत नियमित करण्यासाठी संधी देण्यात यावी.दिलेल्या कालावधीत त्यांनी आपली अनाधिकृत बांधकामे नियमित केली नाही तर त्यांना नियमानूसार शास्ती लावण्यात यावी,

**शेर अली** उपसमितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने मालमत्ता कर आकारणी करण्यास मान्यता दिलेली आहे.उपसमितीच्या सर्व शिफारशीनुसार करण्यात यावे अंशत: उपसमितीच्या शिफारशी लागू करण्यात येवू नये. आयुक्तांनी सामान्य कराचा दर ०.३ अशी शिफारशी केली होती सर्वसाधारण सभेने सदर दर कमी करुन त्या ऐवजी ०.१५ असे करण्यास मान्यता दिलेली आहे.परंतु इतर ५ उपकर वाढविण्यास मान्यता दिलेली नाही.यापुर्वीचे जे उपकर आहेत त्यात वाढ न करता तेच कायम ठेवण्यात यावेत. अनाधिकृत बांधकामधारकांना आपले बांधकाम नियमित करण्यासाठी संधी देण्यात यावी दिलेल्या मुदतीत त्यांनी आपले अनाधिकृत बांधकामे नियमित केली नाही तर शास्ती लावण्यात यावी. गावठाण जाहिर करण्यात आलेले नसल्यामूळे नागरीकांना डबल अकृषिक कराचा भरावा लागत सर्वसामान्य नागरीक डबल अकृषिक कराचा भरणा करु शकत नाही त्यामूळे गावठाण जाहिर करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**किशोर यादव** वजिराबाद भाग हा गावठाण मध्ये मोडत असतांना या भागातील रहिवाश्यानं कार्यालयाकडून अकृषिक कराच्या नोटीसा देण्यात येत आहे.करीता वजिराबाद भाग गावठाण जाहिर करण्यासाठी शासनास शिफारस करण्यात यावी.

**बावजीर शेख हबीब** जून्या नांदेड शहराचा पुर्ण भाग जसे सराफा,नांवघाट ई.गावठाण मध्ये येतो याभागातील रस्त्याकरीता जागा संपादन करण्यात आलेल्या असून जागा मालकांना मोबदलाही देण्यात आला तरी पण नागरीकांना अकृषिक कराच्या नोटीसा देण्यात येत आहेत हे चुकीचे आहेत त्यांना अकृषिक कराच्या नोटीसा न देण्यात बाबत जिल्हाधिकारी कार्यालयास कळविण्यात यावे विनाकारण नागरीकांना त्रास देण्यात येवू नये.

**रामनारायणजी काबरा** गावठाणची व्याख्या काय आहे. हा प्रश्न जिल्हा नियोजन विकास समितीच्या सभेमध्ये सुध्दा उपस्थित करण्यात आला होता.१९५० ला शासनाने गावठाणचे संदर्भात जीआर काढला होता त्यानंतर जीआर निघालेला नाही. गावठाण म्हणजे ज्या ठिकाणी लोकवस्ती झाली त्याभागास गावठाण संबोधण्यात येते.१९५० नंतर शहरात ज्या ठिकाणी वस्त्या झाल्या त्या गावठाण म्हणून जाहिर करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. फक्त प्रस्ताव सादर करुण उपयोग होणार नाही तर शासनाकडे सतत पाठपुरावा करावा लागणार आहे.महापौरांनी शिष्टमंडळ घेवून मुख्यमंत्र्यांना भेटावे व त्याचे समोर आपली व्यवथा मांडावी.गावठाण जाहिर झाले तर एफएसआय सुध्दा वाढवून मिळेल.मालमत्ता कराच्या मागणी नोटीसीमध्ये खुप क्लरीकल चुका झालेल्या आहेत त्याची तपासणी करुन सुधारणा करणे आवश्यक आहे. झोपडपटीधारकांना तीन-चार पटीने कराची आकरणी करण्यात आलेली आहे याचा पुरावा आमच्याकडे आहे. नियमानुसार मागील कराच्या दुप्पट कर आकारता येत नाही.वाणिज्य वापराच्या इमारतीना तिन पटीपेक्षा जास्त कर आकारता येत नाही दुप्पटीने कर आकारणी करण्यात आल्यामूळे नागरीक कोर्टात जातील. रेडी रेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे परतु जे जूने घर आहे त्याचे बांधकाम केंव्हा झाले ते पाहून दरवर्षी घसारा ( डेप्रिशियऐशन) रक्क्म वजा करुन मालमत्ता कराची आकारणी व्हावयास पाहिजे पंरतु तसे झाले नसल्याचे दिसून येते.दोन्ही तरोडयाचा भाग नुकताच महानगरपालिकेत समाविष्ट झालेला असून या भागात महानगरपालिकेने कोणत्याच प्रकारच्या नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नसल्यामूळे त्याभागात मालमता कर वाढविणे योग्य नाही.त्या भागातील जे काही मर्यादीत स्वरुपाचे प्रश्न आहे ते सोडविण्यात यावे.

**बाळासाहेब देशमूख** मालमत्ता कराच्या वाढी संदर्भात महासभेने जो निर्णय धेतला त्या पध्दतीने कार्यवाही झालेली नाही.नागरीकांना ४-५पटीने कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.याबाबतीत बिल कलेक्टर,क्षेत्रिय अधिकारी काहीच खुलासा करण्यास तयार नाही.जी कर वाढ करण्यात आली आहे त्या विरोधात नागरीकांच्या वतीने आदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनास सर्व पक्षाच्या नगरसेवकानी सहकार्य करावे अशी विनंती आहे.

**फारुख अली खा** महानगरपालिकेने करात वाढ केल्यामूळे नागरीकामध्ये खुप संताप निर्माण झालेला आहे तो महापौरांना आयुक्तांना दिसून येत नाही काय श्री शफि अहेमद कुरेशी. व इतर स.सदस्यांनी कर वाढीच्या संदर्भात ज्या सुचना केल्या त्याकडे आयुक्ताचे लक्षच नाही मी जो कर वाढीचा निर्णय घेतला तो बरोबर आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही करणाच अशीच भूमिका आयुक्तांची आहे.उपसमितीने सामान्य कराचा दर ०.१५ सुचविला होता व त्यास जीबीने मान्यता दिली होती.महानगपालिकेची

आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे तरच वार्डात विकासाची कामे होती याची आम्हाला कल्पणा आहे परंतु एवढया मोठया प्रमाणात कर वाढविला आहे की त्यामूळे आम्ही नांदेडचे रहिवाशी आर्थिक परेशानीत आहे.सामान्य करात वाढ करण्यास मान्यता दिली होती परंतु त्या खालील जे पाच उपकर आहे शिक्षणकर,वृक्षकर.ई.या उपकरात वाढ करण्यास उपसमितीने शिफारस केली नव्हती. व जीबीने मान्यता दिली नव्हती तरीपण उपकरात वाढ कशी काय करण्यात आली.नागरीकांना रु.१५८००/- च्या नोटीसा देण्यात आल्या त्यांनतर नागरीकंानी आक्षेप घेतल्यानंतर कर कमी करण्याऐवजी रु.२९८००/- च्या नोटीसा आल्या हा कोणता अजूबा आहे.नागरीक कर कमी करण्यासाठी जातो त्याना वाढीव कराच्या नोटीसा देण्यात येत आहे ही खुप गंभिर बाब आहे नागरीकांवर जुल्म करण्यात येत आहे.नागरीकाना पुर्वी सामान्य कर रु.१०००/- कर होता पुनर कर आकारणीत सामान्य कर रु.१५००/- कर यावयास पाहिजे परंतु इतर पाच सहा उपकरात वाढ केल्यामूळे रु.२५०००/-च्या कराच्या नोटीसा येत आहे.शिक्षण कर रु.२५-३० भरण्यास नागरीक कचरणार नाहीत परंतु आता शिक्षण कर १०००-१२०० आकारण्यात येत आहे नागरीक एवढा कर कसा भरतील.ड्रेनेज शिटलाही ३००/-६००/- आकारण्यात येत आहे ज्या भागात पाणी पुरवठा मलनिस्सारण लाईन नसतांनाही मलनिस्सारण कर, पाणी कर.लावण्यात येत आहे. सुविधा असलेल्या व सुविधा नसलेल्या भागाचा उपकराचा दर सारखाच आहे. हा नागरीकांवर अन्याय आहे. वाढीव कराच्या बाबतीत जनतेच्या भावना समजावून घेवून आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा वापर करुन नांदेडच्या जनतेला वाढीव करातून मुक्ती द्यावी अशी माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे.

**डॉ.करुणा जमदाडे** ज्या घराना ड्रेनेज कनेक्शन नाही. जेथे पाणी पुरवठयाची व्यवस्था नाही त्याभागातील नागरीकांना मलनिस्सारण कर,पाणी कर लावण्यात येते आहे, नागरीकांना कोणत्याच नागरी सुविधा देण्यात येत नाही त्याना वाढीव कर आकारणे हे चुकीचे आहे यांचा सभागृहाने विचार करावा. -

**महापौर** सर्वसाधारण सभेने फक्त सामान्य करात वाढ करण्यास मान्यता दिली होती इतर शिक्षणकर,वृक्षकर,अग्नीशमन कर आदी ५-६ उपकरात वाढ करण्यास मान्यता दिली नसतांनाही उपकरात वाढ करण्यात आलेली आहे .उपकराच्या नोटीसा वेगळया द्यावयास पाहिजे होत्या,याुपर्वी ज्या घरानां ३७० टॅक्स लागत होता आता त्या घरास रु.२०००/- टॅक्स लागत आहे.बिएसयुपी घरांनाही रु.७००/- टॅक्स आकारण्यात येत आहे.ब-यांचश्या नागरीकांना कराच्या नोटीसा चुकीच्या देण्यात आलेल्या आहेत त्याची दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

**स.जानी** सर्व सदस्यांनी नागरीकानी वाढीव मालमत्ता करास विरोध केलेला आहे. माझी अशी सुचना आहे की. या संदर्भात एक विशेष सभा घेण्यात यावी.प्रत्येक प्रभागातील नागरीकांशी चर्चा करुन त्याचे म्हणणे ऐकुन त्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** श्री शफि अहेमद कुरेशी व श्री आंनदरावजी चव्हाण यांनी जो प्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे त्या अनुषंगाने सभागृह जो काही निर्णय घेईल त्याप्रमाणे आयुक्त साहेब निर्णयाची अमलबजावणी करणार आहेत काय याचा खुलास आयुक्त साहेबांनी करवा. घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी होत नसेल तर या सभागृहाचा अवमान आहे. उपसमितीने फक्त सामान्य करात वाढ करण्याची शिफारस केली होती त्यास महासभेने मान्यता दिली होती असे असतांना इतर उपकरात जसे शिक्षण,वृक्ष ,अग्नीशमन अशा इतर उपकरात कशी काय वाढ करण्यात आली आहे.ज्या भागात महानगरपालिकेच्या शाळा नाही त्या भागातही शिक्षण कर आकारण्यात येत तरोडा खुर्द व बुद्रूक हा भाग महानगरपालिकेत विलीन करतांना त्या भागातील नागरीकांना असे सांगण्यात आले होते की. ६ वर्ष या भागात कोणताही कर आकारण्यात येणार नाही याची जाणीव त्याभागातील नागरीकांना जाणीव आहे,असे असतांना त्या भागात कराची आकारणी करण्यात येत आहे. गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत कौठा, असर्जन, असदवन या काही भागात लोकवस्ती नसतांना ड्रेनेज पाणी पुरवठा लाईन टाकण्यात आल्या रस्ते नाल्याची कामे करण्यात आली परंतु सिडको, हडको,वसरणी.भागात नागरीक राहतात तेथे पाणी पुरवठा,मलनिस्सारण लाईन, रस्ते नाल्याची कामे करण्यात आलेले नाही तरी पण त्या भागातील नागरीकांना शिक्षणकर. स्वच्छता कर.अग्नीशमनकर आदी उपकर लावण्यात येत आहे.हे योग्य आहे काय, नागरीकांनी आम्हाला निवडून दिलेले असून आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहोत. आमच्याकडे प्रभागातील नागरीक वाढीव कर आकरणीच्या संदर्भात वारंवार तक्रारी करीत आहे. कर कमी झाला नाही तर नागरीक आम्हाला प्रभागात फिरु देणार नाही.नागरीकांना न्याय मिळाला पाहिजे. महासभेने ०.१५ दराने मालमत्ता कर आकारण्यास करण्यास मान्यता दिली होती इतर पाच सहा उपकरात वाढ करण्यास मान्यता दिली नव्हती, याचे भान ठेवून या त्याचा विचार करुन लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा,

**सोनाबाई मोकले** गोरगरीब नागरीक खुपच कर वाढल्याच्या तक्रारी करीत असून नागरीकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. आजच्या सभेत वाढीव कराच्या संदर्भात प्रस्ताव असल्यामूळे आजच्या सभेला मिटिंगला जावून कर कमी करावा अशी मागणी करीत आहे. त्यांना आम्ही काय सांगावे स. सदस्यांनी मालमत्ता कर कमी करुन गरीबाचे वाली व्हावे अशी विनंती आहे.

**बावजीर शेख हबीब** शहरातील पुर्ण जनता, प्रत्येक स.वाढीव कर हा अन्याय कारक असल्यामूळे वाढीव करास विरोध करीत असतांना प्रशासन मात्र आपली मनमानी करुन एकतर्फी निर्णय घेत आहे.नागरीकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे.सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे अमलबजावणी व्हावयास पाहिजे. नागरीकंना अन्यायकारक वाढीव टॅक्स आकारण्यात येत आहे त्यावर विचार होणे आवश्यक आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सर्वसाधारण सभेने कर वाढ केलेली नाही उलट प्रशासनाने सामान्य कराचा जो दर सुचविला होता तो दर ५० टक्केनी कमी केलेला आहे वाढ केलेली नाही. महासभेने वाढ केलेली नाही. आयुक्तांनी सर्वसाधारण सभेस सामान्य कराचा दर ०.३ लागू करण्याची शिफारस केली होती परंतु सदरील दर जास्त वाढत असल्यामूळे याप्रकरणी अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी उपसमिती कायम केली होती या उपसमितीने सामान्य कराचा दर ०.३ ऐवजी ०.१५ या दराने करण्याची सर्वसाधारण सभेस शिफारस केली होती व त्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती.रेडी रेकनरच्या ०.३० या करावाऐवजी ०.१५ या दराने कर आकरणी केल्यास पुर्वीचा सामान्य कर कमी होत असेल तर तो कमी न करता पुर्वीचाच कर कायम ठेवण्यात यावा असा निर्णय घेण्याची आयुक्तांनी मागणी केली होती. आयुक्तांनी केलेली सुचना उचित व योग्य असल्यामूळे पुर्वीपेक्षा सामान्य कर कमी होवू नये म्हणून सर्वसाधारण सभेने त्यास मान्यता दिली उपसमितीने केलेल्या शिफारशीनूसार सर्वसाधारण सभेने सामान्य कराचा दर ०.३ ऐवजी ०.१५ या दर निश्तिच करुन त्याप्रमाणे सामान्य कर आकाणी करण्याचे अधिकार आयुक्तानी दिले होते इतर कोणत्याही उपकरात जसे शिक्षण, अग्नीशमन, वृक्ष या उपकरात वाढ करण्यास मान्यता उपसमितीने शिफारस केली नव्हती किती याबाबत सर्वसाधारण सभेतही चर्चा झाली नव्हती.त्यामूळे या उपकराचे पुर्वीच दर कायम ठेवावयास पाहिजे होते परंतु जेव्हा कराच्या नोटीसा पाहिल्या त्यामध्ये इतर उपकराचे दरही वाढविण्यात आल्याचे निदर्शनास आले यामूळे करामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते, याचे कारण हेच आहे. महासभेने मान्यता दिलेली नसतांना ५ उपकरात वाढ करण्यात आलेली आहे. सर्वसाधारण सभेने जो निर्णय घेतला होता त्याप्रमाणे अमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.करीता आयुक्त साहेबांनी वाढीव उपकराच्या बाबतीत जेस्टीफाय रिचेक करुन पुर्वीचेच उपकराचे दर कायम ठेवावे. सर्वसाधारण सभेने ज्या मालमत्ताधारकानी मंजुर नकाशा विरुध्द जेवढे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे तेवढयाच अनाधिकृत बांधकामास शास्ती लावण्याची मान्यता दिली होती पंरतु मालमत्ताधारकांना होती.मी महापौरांना धन्यवाद देतो त्यांनी सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जेवढे अनाधिकृत बांधकाम झालेले आहे तेवढयाच बांधकामास शास्ती लावण्याची मागणी आयुक्तांकडे केली व ती आयुक्तांनी मान्य केली.मा.महापौरांच्या प्रभागातील एका नागरीकांस पुर्वी रु.३००/- कर होता पुनर कर आकरणीमध्ये रु.२०००/- व अनाधिकृत बाधकाम शास्ती म्हणून रु.३०००/- याप्रमाणे ५०००/- कराची नोटीस देण्यात आली. त्यांना शास्ती माफ केल्यास आपण पुर्ण कर भरणार काय अशी विचारणा केली असता त्यांनी मान्यता देवून रु.२०००/- कर भरलेला आहे नागरीक शास्ती माफ करण्याची मागणी करीत असल्यामूळे शास्त माफ करणे आवश्यक आहे. शासन जीआर नुसार २००८ पुर्वी झालेल्या अनाधिकृत बाधंकामां शास्ती न लावण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. महानगरपालिकेचे बिल कलेक्टरनी जेव्हा मालमत्ताधारकांकडून ॲसेटमेंटचा फार्म भरुन घेतला त्यावेळेस नागरीकांना २००८ पुर्वीचे बांधकाम दाखविले तर मागील तारखेपासून वाढीव मालमत्ता कर आकारल्या जाईल असे सांगितल्यामूळे मागील तारखेपासून वाढीव कर लागू नये म्हणून नागरीकांनी २००८ नंतरचे बांधकाम दाखविलेले आहे.नागरीकामध्ये मोठया प्रमाणात संभ्रम निर्माण झालेला आहे इमारतीचे अनाधिकृत बांधकाम केंव्हा झाले याचा पुरावा उपलब्ध्द होवू शकत नाही. त्यामूळे नागरीकाना आपली अनाधिकृत बाधकामे नियमित करण्यासाठी अवधी देण्यात यावा. ३१ जानेवारी पर्यत जे नागरीक आपला कर भरतील त्यांना २ टक्के सुट देण्याची योजना जाहिर करण्यात आली परंतु ब-याचश्या नागरीकाना अद्याप मागणी नोटीसा मिळालेल्या नसल्यामूळे या योजनेस मुदतवाढ देण्यात यावी. अनाधिकृत बांधकामावर लावण्यात आलेली शास्ती माफ करण्यात यावी.रेडीरेकनर प्रमाणे इमारतीचे मुल्य निश्चित करतांना खुप क्लरीकल मिस्टेक झालेल्या आहेत.विनायक नगर भागात ज्योती भारती यांचे घर अंतर्गत रस्त्याचे बाजूचे असतांनाही हिंगोली रोडचे रेडीरेकनर वापरल्यामूळे त्यांच्या मालमत्तेस रु.३० हजार रुपया कर आकारण्यात आला ही चुक लक्षात आल्यामूळे दुरुस्ती करण्यात आली प्रत्येक नागरीकांकडें रेडीरेकरनचे पुस्तक नसल्यामूळे प्रत्येक नागरीक रेडीरेकनरप्रमाणे मालमत्ता कराची

आकारणी केली आहे किंवा नाही याची तपासणी करुच शकत नाही. त्यामूळे आयुक्त साहेबांना विंनती आहे की. महानगरपालिकेच्या अधिका-या मार्फत त्या त्या भागात नियमानुसार रेडीरेकनर प्रमाणे कराची आकारणी केली आहे किंवा नाही तपासणी करुन घ्यावी ज्या आरक्षित जागेवर अनाधिकृत बाधकामे झालेली आहे तो संपुर्ण भाग स्लम व झोपडपटी भाग असून आरक्षित जागेवर बांधकामास परवानगी मिळत नसल्यामूळे नागरीकानी अनधिकृत बाधकामे केलेली आहे.अनाधिकृत बाधकामे असतांनाही महानगरपालिका त्या भागातील नागरीकाना मुलभूत नागरी सुविधा जसे रस्ते. नाल्या. लाईट पाणी पुरवठा .मलनिस्सारण ई.नागरी सुविधा महानगपालिका देत आहे त्यामूळे अनाधिकृत बांधकामावरील १०० टक्के शास्ती माफ करण्याबाबतही निर्णय घेण्यात यावा अशी मी सभागृहाकडून अपेक्षा व्यक्त करतो.

**संजय मोरे** वसरणी,आसदवन हा भाग गावठाण भाग असतांनाही या भागातील नागरीकांना अकृषिक कर भरणा करण्याच्या नोटीसा देण्यात येत आहे.

**सरजितसिंघ गिल** आताच श्री विरेंद्रसिंध गाडीवाले यांनी सांगितल्या प्रमाणे महासभेने कर वाढ केलेली नाही. प्रशासनाने जो ०.३० टक्के कर वाढीचा दर सुचविला होता त्यामध्ये ५० टक्के म्हणजे ०.१५ दर कमी केलेला आहे.कर वाढ करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना सभागृहाने नियमाप्रमाणे ज्या नागरीकानी बांधकाम परवानगी घेवून बाधकाम केले परंतु प्रत्यक्षात मंजुर नकाशा विरुध्द जेवढे अनधिकृत बांधकाम केले तेवढयाच अनाधिकृत बांधकामास शास्ती लावावी .पुर्ण इमारतीस अनाधिकृत बांधकाम समजुन शास्ती लावू नये असा निर्णय धेतला होता. मा.महापौरांनी या केलेल्या सुचनेची आयुक्त साहेबांनी अमलबजावाणी केली त्याबध्दल मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो. शासन निर्णयानुसार २००८ पुर्वी जी अनाधिकृत बांधकामे झाली त्यास शास्ती न लावण्याचा आपण निर्णय धेतलेला आहे. परंतु २००८ नंतर जी इमारतीची बांधकामे झालेली आहे त्यामध्ये नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेवून मंजुर नकाशा विरुध्द जेवढे अनाधिकृत बांधकाम झालें तेवढयाच भागास शास्ती लावण्याची दक्षता आयुक्त साहेबांनी घ्यावी.आयुक्त साहेबांनी झोपडपटी भागातील गोरगरीब नागरीकांचे घराना कर वाढणार नाही असे सांगितले होते परंतु श्री शेर अली यांनी झोपडपटी भागातील गोरगरीब नागरीकांच्या घरांचे टॅक्समध्येही वाढ केल्याचे सांगुन या नागरीकांना स्वत: घरात राहणे मुश्किल होईल.केंद्र शासनाच्या बिएसयुपी योजने अंतर्गत नांदेड शहरातील झोपडपटी भागातील नागरीकांकरीता २७ हजार घराचे बांधकाम करुन देत असून या धराची प्रत्येकी किंमत रु.४ लक्ष आहे.गोरगरीबांना फुकट शासन ४-४ लाखाची घरे बांधून देत आहे आपण त्यांना टॅक्सची सवलत देवू शकत नाही काय मा.महापौरांच्या वार्डात धराचे बाधकाम करण्यासाठी रु.१००/-कोटीचा निधी आलेला आहे .यापुर्वी घराचे बांधकामासाठी एवढया मोठया प्रमाणात निधी प्राप्त झाला होता नव्हता पंतप्रधान डॉ.श्री मनमोहनसिंघजी यांचे कार्यकाळात निधी प्राप्त झालेला आहे.गोरगरीबांच्या ५०० चौ.फुटाचे बाधकाम असलेल्या मालमत्तांचा कर वाढणार नाही याची दक्षता आयुक्तांनी घ्यावी .श्री विरेद्रसिंघ गाडीवाले यांनी सांगितल्या प्रमाण् सर्वसाधारण सभेने फक्त सामान्य करात वाढ करण्याचे अधिकार आयुक्त साहेबांना दिले होते शिक्षण कर,वृक्षकर आदी उपकरात वाढ करण्याचे अधिकार दिलेले नसतांना त्यात वाढ करण्यात आल्यामूळे इतर उपकर कमी करण्यात यावे. शहरातील विविध भाग गावठाण म्हणुन जाहिर करण्याचा अधिकार हा राज्य शासनाचा असल्यामूळे गावठाण जाहिर करण्यासाठी ठराव पारीत करावा लागेल परंतु ठराव पारीत करुन उपयोग होणार नाही याचा पाठपुरावा शासन दरबारी करावा लागेल.याकरीता मा.महापौरांनी सर्व पक्षीय सदस्याचे शिष्टमंडळास मा.मुख्यमंत्र्यांना भेटावे व त्यांना आमची मागणी आवर्जून पुर्ण करण्याचा आग्रह करावा लागेल. या शिष्टमंडळात राष्ट्रवादी पक्षाचे नेते व जेष्ठ स.सदस्य श्री रामनारायणजी काबरा यांचाही समावेश करण्यात यावा. राष्ट्रवादी पक्षाचा आपणास पाठिबां असल्यामूळे याप्रकरणात श्री रामनाराणजी काबरा सर्व सहकार्य करतील अशी मी त्यांचेकडून अपेक्षा व्यक्त करतो. गोरगरीब नागरीकांना वाढीव मालमत्ता करापासुन राहत द्यावी अशी मी महापौर व आयुक्त साहेबांना सुचना करतो.तसेच स. सदस्याचे मत विचारात घेता सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा मालमत्ताधारकाना अनाधिकृत बांधकामाची जी शास्ती लावण्यात आलेली ती अन्यायकारक असल्यामूळे मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यतची मुदत देण्यात यावी व त्यांनंतर अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीनां मालमत्ता करात शास्ती लावण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभा निर्णय घेईल तुर्त चालू आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकाना अनाधिकृत बाधकामाची शास्ती लावण्यात आलेली ती शास्ती मागणी बिलातून कमी करण्यात यावी तसेच सन २०१३-२०१४ चे कर मागणी बिले माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ मध्ये देण्यात येत आहेत

त्यामूळे चालू वर्षाचा कर माहे डिसेंबर २०१३ नंतर भरणा केल्यामूळे २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये.व दि.२८ फेब्रूवारी २०१४ पर्यंत जे मालमत्ता धारक चालू वर्षाचा पूर्ण कर भरणा करतील त्यांना २ टक्के सुट मालमत्ताकरात देण्यात यावी व थकबाकीवरील शास्ती १०० टक्के माफ करण्यात यावी यापुर्वी भरणा केलेली वरील प्रमाणे प्राप्त होणारी सुट व माफीची रक्कम पुढील वर्षात समायोजन करण्यात यावी तसेच जानेवारी ते मार्च २०१४ कालावधीकरीता दरमहा २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये असा माझा प्रस्ताव आहे. त्यास मान्यता देण्यात यावी.

**बाळासाहेब देशमूख** बिएसयुपी योजने अंतर्गत ज्या घराचे बांधकाम झालेले आहे त्या घरांनाही पाच हजार कर आकारण्यात आलेला आहे

**अनुजा तेहरा** मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यंतची मुदत देण्यात यावी

**शफि अहेमद कुरेशी** आयुक्तांनी खुलासा करण्यापुर्वी मी एक शेर पेश करतो नदीकी कहानी सदीयोसा पुराना मै प्यासा हू दो घुट पाणी पिलाना

**आयुक्त** स.महापौर स. सदस्य, मालमत्ता कराच्या संदर्भात स.सदस्यांनी बरेचशे प्रश्न उपस्थित केलेले आहे. सर्वाना असेच वाटत आहे की आयुक्त जी श्रीकांतच करवाढ करीत आहे महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ झाली तर मला शासनाकडून अवार्ड मिळेल परंतु असे मुळीच नाही. या सभागृहात बहुसंख्य जुने अभ्यासू जाणकार सदस्य त्याचें कतृत्वावर पुन्हा निवडून आलेले आहेत त्यांना कल्पणा असेलच जेव्हा केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत विशेष बाब म्हणून नांदेड शहराचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने महानगरपालिका व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी (Reform) जसे मालमत्ता कराची नियमीत पुर्नर कर आकारणी करणे तसेच प्रत्येक वर्षी कमीम कमी ८५% च्या वर वसुली करणे आवश्यक आहे.मनपा कडून पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधा योग्य प्रकारे व्यवस्थापनासाठी योग्य वापर शुल्क आकारणे व वसुली करणे.शहरातील गरीब नागरीकांच्या मुलभुत गरजा लक्षात घेवून लोकभिमुख अर्थसंकल्प तयार करुन आवश्यक त्या तरतुदी करणे.नागरीकांना मुलभुत सोई मध्ये, गृहनिर्माण, पाणी पुरवठा, स्वच्छता, शिक्षण, व सामाजिक आरोग्य इत्यादीसाठी खास व्यवस्था करणे अशा सूधारणा करण्याची हमी देण्यासाठी कळविले होते व त्यांनुसार या सभागृहाने केंद्र शासनाचा रिफार्म स्विकारण्यास एकमताने मान्यता दिली होती.या ठरावास कोणीही विरोध केला नव्हता सभागृहाने पारीत केलेला ठराव राज्य शासना मार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला व सभागृहाने मान्यता दिल्यानुसार केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत विशेष बाब म्हणून नांदेड शहराचा समावेश केला आणि या योजने अंतर्गत शहरात विकासाची कामे करणेसाठी शासनाकडून जवळपास रु.२०००/-कोटीचा निधी प्राप्त होवून या योजनेच्या माध्यमातून शहरात मोठया प्रमाणात विकासाची कामे झाली केंद्र शासनाकडे महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून आयुक्तांना पाठपुरावा करावा लागतो. केंद्र शासनाच्या रिफॉर्ममुळे महानगरपालिकेच्या कामकाजात अमुलाग्र बदल झालेला आहे. गोरगरीब नागरीकांना अत्यांवश्यक नागरी सुविधा देवून त्यांचे आशिर्वाद घेण्यासाठी तुम्ही आम्ही या ठिकाणी बसलेलो आहेत.शहरातील नागरीक महानगरपालिकेकडे रस्ते.नाल्या,पाणी पुरवठा ,स्ट्रिट लाईट,आरोग्य,साफसफाई ई.नागरी सुविधा पुरविण्याची मागणी करतात सध्याची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता निधी शिवाय नागरीकांना या सर्व सुविधा पुरविणे अशक्य होत आहे नागरीकाना मुलभूत अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक झालेले आहे.पाणी पुरवठा योजने वर शासनाकडून एक रुपयाचा निधी मिळत नाही. महानगरपालिका हदीत मोठया प्रमाणात लोकवस्ती/गृहनिर्माण सोसायटी उदयास येत आहे. एमआरटिपी ॲक्ट नुसार या विस्तारीत लोकवस्तीत सोसायटीत रस्ते, नाल्या, स्ट्रिट लाईन,पाणी पुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था ई.कामे संबंधित संस्था करीत नाहीत महानगरपालिकेस ही सर्व विकासाची कामे वार्ड विकास निधी अंतर्गत मालमत्ता करातूनच करावी लागतात.महापालिका नागरीकांना निरंतर अत्यावश्यक नागरी सुविधा उपलब्द करुन देते.नागरी सुविधा पुरविण्याच्या खर्चात दरवर्षी वाढ होते.कर्मचा-यांच्या पगारावरही दरवर्षी वाढ होते.आणि म्हणून दर चार वर्षाला मालमत्ता कराची पुनरकर आकारणी करण्याची कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे.महानगरपालिकेने यापुर्वी सन २००५ ला पुनर कर आकारणी केली होती व त्यानंतर सन २००९ ला पुनर कर आकारणी करावयास पाहिजे होती परंतु त्यावर्षी आपण केलेली नाही.आता २०१३-२०१४ ला केलेली आहे.सन २००९ ला पुनर कर आकारणी केली असतील तर पुनर कर आकारणीचा एवढा परिणाम दिसून आला नसता स. सदस्यांच्या शिफारशीनूसार प्रत्येक प्रभागात अविकसित भागात नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्द्द करुन देण्यासाठी महानगरपालिकेकडे निधी असणे आवश्यक आहे,उत्पन्न वाढीसाठी मालमत्ता करात वाढ करणे अपरिहार्य आहे.

गोरगरीबांच्या ५०० चौ.फुटाचे बांधकाम असलेल्या मालमत्तेचा आपण कर वाढविलेला नाही.पुर्वीचाच कर कायम ठेवलेला आहे.हजारो घराची पुनर कर आकारणी करीत असतांना कर्मचा-यांकडून ,बिलकलेक्टर कडून अनावधानाने काही आकडयांच्या चुका झालेल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात येतील. मालमत्ताधारक जेव्हा कर भरतो तेव्हा तो नागरी सुविधाचा हक्कदार बनतो त्यास नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देणे आवश्यक आहे.कर्मचा-यांनाही पगार देणे आवश्यक असून याकरीता महानगरपालिकेकडे निधी असणे आवश्यक आहे निधी नसेल तर महानगपालिकेची पुर्ण व्यवस्था कोलमडून जाईल बंद पडेल. या जिल्हयाचे प्रमुख दोन वेळेस मुख्यमंत्री झाल्यामूळे शहराचा विकास झालेला असुन यापुढेही विकासाला स्कोप आहे. केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत नांदेड शहराचा खुप मोठा कायापालट झालेला आहे. नागरीकांना सर्व भौतिक सुविधा मिळत आहे. दुस-या महानगरपालिकेची काय परिस्थिती आहे, मी औरंगाबाद ,परभणी महानगरपालिकेस भेट दिली खुप वाईट अवस्था आहे, तेथे कोणत्याही प्रकारचे रिफार्म नाही. आपण जेएनएनयुआरएम योजने अतर्गत केलेल्या विकास कामाची दरवर्षी देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निधीची गरज आहे .बिएसयुपी योजेने अंतर्गत नांदेड शहरासाठी २७ हजार घरे मंजुर झालेली असून ५० टक्के कामे झालेली आहेत त्या सोबत त्या भागातील विकासाची कामे झालेली आहेत.इतर शहराकरीता एवढया मोठया प्रमाणात मंजुर झालेली नाहीत. पुर्वी नई आबादीचा भाग कसा होता आता तो भाग बघावा मी म्हणत नाही की पुर्ण नांदेड शहराचा विकास झालेला आहे नव्याने समाविष्ट झालेल्या अविकसीत भागात रस्ते,नाल्या नाहीत हे करण्यासाठी आपणास निधीची आवश्यकता आहे.केंद्र शासनाचा रिफार्म स्विकारला नसता तर आता जेएनएनयुआरएम योजने अतर्गत दोन्ही तरोडा,सिडको भागात विकासाची कामे करण्यासाठी नव्याने रु.१००० कोटीचा निधी आला नसता.जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मंजुर झालेल्या कामांच्या अंदाजपत्रकिय किमतीचा निधी मिळतो.अदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या निविदाचा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करावा लागत आहे.सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असुन मला ती आणखी खराब करावयाची नाही.वेळोवेळी पत्रकार परिषदा घेवून वाढीव कराच्या संदर्भात मी खुलास केलेला आहे.तसेच प्रत्येक क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत त्या त्या भागातील प्रतिष्ठीत नागरीक,वकील,व्यापारी,कामगार वर्गाच्या बैठका घेवून त्याचे प्रश्नाचे समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत त्यांचे समाधान झाले किंवा नाही हा ज्याचा त्याचा वैयक्तीक प्रश्न आहे.बैठकीस उपस्थित उपस्थित असलेल्या मजुरांना सन २००५ मध्ये आपणास काय रोजंदारी मिळत होती व आता सन २०१३ ला किती रोजंदारी मिळते अशी विचारणा केली असता त्यांनी दरवर्षी मजुरीच्या दरात ५ ते १० टक्यांनी वाढ होत असल्याचे सांगितले. महानगरपालिकेने दरवर्षी ५-१० टक्क्यांनी करात वाढ केली का .सन २००५ ला पुनर कर आकारणी केली होती व त्यांनतर प्रामाणिकपणाने २००९ ला करावयाव पाहिजे होती ती आपण २०१३ ला केली. शासनाने विविध योजने अंतर्गत मंजुर केलेल्या निधीतून कामे करण्यासाठी महानगरपालिकेच्या लोकसहभागाची रक्कम भरणा करण्यासाठी महानगरपालिकेस वित्तीय संस्था कडून कर्ज घेण्यात आलेले असून महानगरपालिकेची बदनामी होवू नये म्हणून कर्मचा-यांचे पगार रोकून कर्जाचे नियमित हप्ते व व्याजाचा भरणा करण्यात येत आहे. आपण ज्या इमारतीत बसलो आहे ती इमारत सुध्दा गहाण टाकलेली आहे.नागरीकांनी कराच्या सुनावणीच्या वेळी यावर्षी आम्हाला मागील करापेक्षा दुप्पट कराच्या नोटीसा आल्याच्या तक्रारी केल्या परंतु २००५ नंतर त्यांनी आपल्या मालमत्तेत केलेला फेरबदलाची अतिरिक्त बांधकांमाची माहिती सांगत नव्हते. वास्तविक पाहता नागरीकांना २००५ नंतर दोन तिन रुमचे अतिरिक्त बांधकाम केल्याचे,टिनशेड काढून त्यावर आर.आर.सी.स्लॅब टाकल्याचे फरशी बसविल्याचे ,दुस-या तिस-या मजल्याचे बांधकाम केल्याचे ,तळमजल्यावरील रहिवाशी वापरात असलेल्या रुमचे वाणिज्यीक वापर करीत असल्याचे,रहिवाशी वापर असलेल्या इमारतीचा वाणिज्यीक वापर होत असल्याचे दिसुन आलेले आहे त्यामूळे या सर्व अतिरिक्त बांधकामावर ,मालमत्ता कर आकारणी करण्यात आली.त्यामूळे मालमत्ता करात वाढ होणार वर्षानुवर्षे करात वाढ न केल्यामूळे नागरीकांना आता जास्त कर वाटत आहे ही वस्तुस्थिती आहे. २००५ मध्ये टॉयलेट सिटची संख्या ३० हजार होती पुनर कर आकरणी केल्यानंतर त्यात वाढ होवून आता टॉयलेट सिटची संख्या १,०५,०००/-झालेली आहे.महानगरपालिकेचा मलनिस्सारण योजने वर जवळपास ७.०० ोटीचा खर्च होतो व त्यापासून फक्त रु.२.५० कोटी रुपयाचे उत्पन्न मिळते दरवर्षी तोटयाचे प्रमाण वाढत आहे.यापुर्वीचे एसटिपी प्रकल्प निधी अभावी बंद पडलेले आहे.गोदावरी शुध्दीकरण योजने अंतर्गत बोंढार येथे नविन एसटिपी सुरु करण्यात आलेले असून सदर पाण्याचा वापर शेतीकरीता करण्यात येत आहे. केंद्र शासनाने परळी थर्मल पावर स्टेशन पाण्या अभावी बंद पडत असल्यामूळे सदरील पाणी परळी थर्मल पावरला देण्याचे सुचविलेले आहे, हे पाणी थर्मल पावरला दिल्यास

महानगरपालिकेस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळे शकते. स.सदस्यांच्या शिफारशीनूसार त्यांचे प्रभागात रस्ते,नाल्या,विद्युत ,ई. विकासाची कामे करण्यासाठी वार्ड विकास निधी अंतर्गत प्रत्येकी फक्त रु.१०.०० लक्षाची तरतूद करतो या १० लक्षाची तरतूदीतून वार्डात विकासाची कामे होवू शकतात काय नाही होवू शकत उत्पन्नात वाढ झाली तर स्वेच्छा निधीची तरतूद आपण वाढवू शकतो. अनाधिकृत बाधकामांच्या बाबतीत राज्य शासनाने योग्य नियोजन करण्याच्या सुचना केलेल्या आहे. सुधारीत डि.सी.रुल मूळे हार्डशिप व प्रिमियम च्या उत्पन्नात वाढ झाल्यामूळे आपण गहाण टाकलेल्या इमारतीचे कर्जाची नियमित परत फेड करीत आहोत.शासन निर्णयानुसार आपण २००८ पुर्वी झालेल्या बेकायदेशिर इमारतीना शास्ती माफ केलेली आहे परंतु २००८ नंतर झालेल्या बेकायदेशिर इमारतीना शास्ती माफ करण्याची मागणी करण्यात येत आहे. याचा अर्थ आपण बेकायदेशिर बांधकामाना प्रोत्साहन देत आहोत असा होतो.२००८ नंतर विनापरवानगीने जेवढया अनाधिकृतरित्या बेकायदेशिर इमारतीचे बांधकामे झाली त्या सर्व बेकायदेशिर इमारतींना शास्ती लावण्यात येईल.संबंधित मालमत्ताधारक गरीब असो वा श्रीमंत नियम सर्वाना सारखा आहे. तो सर्वानी पाळला पाहिजे.उपसमितीने २००८ पुर्वी झालेल्या बेकायदेशिर इमारतीचे बांधकामाना शास्ती लावू नये अशी शिफारस केली होती .सर्वसाधारण सभेने २००८ नंतर ज्या मालमत्ता धारकांनी नियमाप्रमाणे् बांधकाम परवानगी घेवून मंजुर नक्शा विरुध्द जेवढे अनाधिकृत जास्तीचे बांधकाम केले अशा जास्तीच्या बांधकामास शास्ती लावावी अशा प्रकारचा ठराव पारीत केला.त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.एमआरटिपी ॲक्ट नुसार सॅक्शंन ॲथारीटी म्हणून याच सभागृहाने नांदेड शहराची विकास योजना तयार केलेली असून शासन मान्यतेने भविष्यातील विकास कामासाठी विविध भागात जागा आरक्षित केलेल्या आहेत.अशा आरक्षित जागेवर बांधकाम परवानगी कशी देता येईल. सभागृहाने अशी आरक्षणे वगळण्याचा निर्णय घ्यावा त्यास शासनाची मान्यता घ्यावी म्हणजे नियमानुसार आरक्षण वगळलेल्या जागेवर बांधकाम परवानगी देता येईल.आरक्षित जागेवर परवानगी मिळत नाही म्हणुन अनाधिकृत बांधकाम केले अशा विना परवानगी अनाधिकृत बांधकामाना शास्ती कशी माफ करता येईल.नियमानुसार अशी शास्ती माफ करण्यात येणार नाही.अकृषिक कराची वसुली शासनाकडून व महानगरपालिकेकडून डबल करण्यात येत असल्याची तक्रार करण्यात येत आहे परंतु तसे नाही.दोन तीन वर्षापुर्वी अकृषिक कराची वसुली शासनाच्या महसूल विभागातील कर्मचा-यामार्फत करण्यात येत होती. या कराची वसुली करण्यासाठी शासनाचा खर्च जास्त होत होता ,महानगरपालिकेचे बिल कलेक्टर मालमत्ता कराची वसुली करीत असल्यामूळे मालमत्ता करा सोबत अकृषिक कराची वसुली करुन महापालिकेने शासनाकडे जमा करावी अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला असल्यामूळे शासन निर्णयानुसार मागील दोन तीन वर्षापासून महानगरपालिकेच्या बिल कलेक्टरमार्फत अकृषिक कराची रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात येत आहे.आता महसुल कर्मचा-याकडून वेगळी नोटीस देवून अकृषिक कराची वसुली होत नाही.शासनाने मिळतील सर्वसाधारण सभेने गावठाण जाहिर करण्यासाठी ठराव घेवून शासनास विनंती करावी. अशा चांगल्या गोष्टीसाठी प्रशासनाकडूनही शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल.उपसमितीने केलेल्या शिफारशीनूसार महासभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे मालमत्ता करात वाढ करण्यात आलेली आहे.इतर ५-६ उपकराच्या बाबतीत चुका
झाल्याच्या तक्रारी करण्यात येत आहे.यामध्ये खरोखरच चुका झालेल्या असतील तर मु.प्रा.म.न.पा. अधिनियमातील तरतूदी तपासुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल,स.सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ज्या मालमत्ताधारकांनी नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेवून मंजुर नकाशा विरुध्द जेवढे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे तेवढयाच अनाधिकृत बांधकामांना शास्ती लावण्यात येईल. तसेच सन २०१३-२०१४ चे कर मागणी बिले माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ मध्ये देण्यात येत आहेत त्यामूळे चालू वर्षाचा कर माहे डिसेंबर २०१३ नंतर भरणा केल्यामूळे २ टक्के शास्ती लावण्यात येणार नाही व दि.२८ फेब्रूवारी २०१४ पर्यत जे मालमत्ता धारक चालू वर्षाचा पूर्ण कर भरणा करतील त्यांना २ टक्के सुट मालमत्ताकरात देण्यात येईल थकबाकीवरील शास्ती १०० टक्के माफ करण्यात येईल यापुर्वी भरणा केलेली वरील प्रमाणे प्राप्त होणारी सुट व माफीची रक्कम पुढील वर्षात समायोजन करण्यात येइल जानेवारी ते मार्च २०१४ कालावधीकरीता दरमहा २ टक्के शास्ती लावण्यात येणार नाही.शहरातील सर्व अनाधिकृत बांधकाम धारकांना गुंठेवारी पध्दतीने व नविन डि.सी.रुल प्रमाणे हार्डशिप प्रिमियम भरुन आपली अनाधिकृत बाधकामे नियमित करुन घेण्यासाठी मागील दिड दोन वर्षपासून नोटीसा देण्यात आलेल्या आहेत परंतु त्यास अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामूळे नाविलाजाने प्रशासनास अशा अनाधिकृ बांधकाम विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.सर्व क्षेत्रिय अधिका-यांना मालमत्ता करवाढी संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करुन त्याचे समाधान करावे तसेच मालमत्ता कराची आकारणी करतांना काही मानवी चुका झालेल्या असतील तर

त्या आपल्यास्तरावर दुरुस्त करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.प्रशासनाने पुनर कर आकारणीची जी काही कार्यवाही केलेली आहे ती सर्व नियमाप्रमाणे केलेली असून ती बरोबर आहे.सर्व प्रभागात विकासाची कामे व्हावीत. गोरगरीबांना मुलभूत नागरी सुविधा मिळाव्यात या दृष्टीकोनातून महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ करण्याचा तुम्ही आम्ही एकत्रित बसून निर्णय घेतलेला असल्यामूळे स.सदस्यांनी प्रशासनास सहकार्य करावे अशी विनंती आहे.

**शेर अली** झोपडपटी भागातील टेम्परारी अनाधिकृत टिनशेडचे बांधकामाना व मातीच्या कच्या बांधकामाना शास्ती लावण्यात येत आहे त्यास आमचा विरोध असून त्याचा निषेध करुन एमआयएम-संविधान पक्षाचे नगरसेवक सभात्याग करीत आहेत.

( एमआयएम-संविधान आघाडीचे स.सदस्य, सलिमा बेगम नुरुल्ला खान, अ.हबीब अ.रहिम बागवान,बिपाशा बेगम सय्यद वलिउध्दीन ,आसीया बेगम अ.हबीब बागवान, सय्यद शेर अली सय्यद महेबुब अली, कुरेशी चांद पाशा खाज्या,फारुख हुसेन कासिम साब, झाकिया बेगम स.मुखतार, बावजीर शेख हबीब शे. अब्दुल्ला,गायकवाड अंजली सुरेशराव, देशमूख बाळासाहेब गंगाधरराव यांनी सभात्याग केला )

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे महानगरपालिका हध्दीत झालेले सर्व अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या सदंर्भात शासन स्तरावर विचार विनिमय चालू असून लवकरच शासन निर्णय अपेक्षित असल्यामूळे सभागृहातील सर्व स.सदस्यांनी केलेली मागणी विचारात घेता सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा मालमत्ताधारकाना अनाधिकृत बांधकामाची जी शास्ती लावण्यात आलेली ती अन्यायकारक असल्यामूळे मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यतची मुदत देण्यात यावी व त्यांनंतर अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीनां मालमत्ता करात शास्ती लावण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभा निर्णय घेईल तुर्त चालू आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकाना अनाधिकृत बाधकामाची शास्ती लावण्यात आलेली ती शास्ती मागणी बिलातून कमी करण्यात यावी, असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमत संमत करते.तसेच यापुर्वी महासभेने पुनरकर आकारणी करण्याच्या ंसदर्भात जो निर्णय धेतला त्या निर्णया प्रमाणे् मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याचे पुनरनिरिक्षण करण्यात यावे. चुकीच्या मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या असेल तर त्या दुरुस्त करण्यात याव्यात

तसेच सन २०१३-२०१४ चे कर मागणी बिले माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ मध्ये देण्यात येत आहेत त्यामूळे चालू वर्षाचा कर माहे डिसेंबर २०१३ नंतर भरणा केल्यामूळे २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये.व दि.२८ फेब्रूवारी २०१४ पर्यत जे मालमत्ता धारक चालू वर्षाचा पूर्ण कर भरणा करतील त्यांना २ टक्के सुट मालमत्ताकरात देण्यात यावी व थकबाकीवरील शास्ती १०० टक्के माफ करण्यात यावी यापुर्वी भरणा केलेली वरील प्रमाणे प्राप्त होणारी सुट व माफीची रक्कम पुढील वर्षात समायोजन करण्यात यावी तसेच जानेवारी ते मार्च २०१४ कालावधीकरीता दरमहा २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये. हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १९५** **ठ रा व**

राज्यातील सर्व महानगरपालिका हध्दीत झालेले सर्व अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या सदंर्भात शासन स्तरावर विचार विनिमय चालू असून लवकरच शासन निर्णय अपेक्षित असल्यामूळे सभागृहातील सर्व स.सदस्यांनी केलेली मागणी विचारात घेता सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा मालमत्ताधारकाना अनाधिकृत बांधकामाची जी शास्ती लावण्यात आलेली ती अन्यायकारक असल्यामूळे मालमत्ताधारकांना आपली अनाधिकृत बांधकामे हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत/गुंठेवारी योजने नियमित करण्यासाठी दि. ३१ मार्च २०१५ पर्यतची मुदत देण्यात यावी व त्यांनंतर अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीनां मालमत्ता करात शास्ती लावण्याच्या संदर्भात सर्वसाधारण सभा निर्णय घेईल तुर्त चालू आर्थिक वर्षात ज्या मालमत्ताधारकाना अनाधिकृत बाधकामाची शास्ती लावण्यात आलेली ती शास्ती मागणी बिलातून कमी करण्यात यावी, असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमत संमत करते.तसेच यापुर्वी महासभेने पुनरकर आकारणी करण्याच्या ंसदर्भात जो निर्णय धेतला त्या निर्णयाप्रमाणे् मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याचे पुनरनिरिक्षण करण्यात यावे. चुकीच्या मालमत्ता कराच्या नोटीसा देण्यात आलेल्या असेल तर त्या दुरुस्त करण्यात याव्यात असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते,नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी .

तसेच सन २०१३-२०१४ चे कर मागणी बिले माहे डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४ मध्ये देण्यात येत आहेत त्यामूळे चालू वर्षाचा कर माहे डिसेंबर २०१३ नंतर भरणा केल्यामूळे २ टक्के शास्ती लावण्यात येवू नये.व दि.२८ फेब्रूवारी २०१४ पर्यत जे मालमत्ता धारक चालू वर्षाचा पूर्ण कर भरणा करतील त्यांना २ टक्के सुट मालमत्ता करात देण्यात यावी व थकबाकीवरील

शास्ती १०० टक्के माफ करण्यात यावी यापुर्वी भरणा केलेली वरील प्रमाणे प्राप्त होणारी सुट व माफीची रक्कम पुढील वर्षात समायोजन करण्यात यावी तसेच जानेवारी ते मार्च २०१४ कालावधीकरीता दरमहा २ टक्के शास्ती लागणार नाही असे ही ही नांवामनपा सर्वानुमते संमत करते. या ठरावाची तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी व या योजनेचा प्रचार व प्रसार आकाशवाणी ,वृत्तपत्रो याव्दारे करण्यात यावा. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.११ :-** **प्रस्ताव**

सिडको भागतील ND१, ND२, ND४, ND१२० या भागातील घरधारकांत चार ड्रेनेज पाईपलाईन एकाच चेंबर कनेक्शनवर देण्यात आले आहेत. चार घरांसाठीचे एक ड्रेनेज पध्दती सध्या नादुरुस्त स्थितीत असल्यामुळे सतत ब्लॉक झालेले असते. फुटपाथवरुन ड्रेनेजचे पाणी सतत वाहत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धेक्यात आले आहे. करिता सध्या नवीन ड्रेनेज पाईपलाईनचे काम सुरु होत असल्यामुळे प्रत्येक घरधारकास स्वतंत्र ड्रेनेज पाईपलाईन तसेच चेंबरची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**सुचकः-** डॉ. ललिता मुकुंद बोकारे (शिंदे) **अनुमोदक :-** सौ. मंगला देशमुख

**प्रशासकीय टिप्पणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सिडको, हडको व इतर भाग दक्षिण नांदेड मध्ये पाणीपुरवठा वितरण नलीका व मलनिस्सारण व्यवस्था चे काम JNNURM अंतर्गत हाती घेतले असून सदर काम हे नोव्हेंबर २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. यातील मलनिस्सारण वाहीन्यांचे काम मे. कल्याण टोल इनफ्रास्टक्चर्स, इंदोर मार्फत संपूर्ण पणे नव्याने हाती घेण्यात येत असून या योजनेमध्ये प्रत्येक घरासाठी स्वतंत्र कनेक्शन मागणी नूसार करता येईल.

**महापौर** प्रस्तावाचे अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १९६** **ठ रा व**

प्रस्तावाचे अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.१२ :-** **प्रस्ताव**

श्री अे.पी.शिर्के, मराठी लघुलेखक, नगरसचिव विभाग नांवाशमनपा नांदेड यांनी १)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९ व २)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२०१/प्रक्र ७/सेवा-९/ दिनांक २७ नोव्हेंबर २००१ अन्वये दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीत केलेल्या वेतन निश्चितीनुसार अनुज्ञेय होणारी थकबाकी भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात वर्ग करण्यासाठी दि.३.१०.२००३ च्या अर्जाव्दारे विनंती केली आहे परंतु आज पर्यत त्यांच्या अर्जावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, करीता श्री अे.पी.शिर्के, मराठी लघलेखक नांवाशमनपा नांदेड यांचे दि.३१.१०.२०१२ चे अर्जावर खालील प्रमाणे ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते निर्णय घेते.

१) महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. वेपुर/प्रक्र.७४/९४/सेवा-१०/ दिनांक २२ एप्रिल १९९४ मधील तरतुदीनुसार श्री ऐ.पी. शिर्के मराठी लघुलेखक मनपा नांदेड यांच्या पदास वेतन श्रेणी रुपये १६४०-२९०० लागु करण्यात आली असुन या वेतनश्रेणीच्या समकक्ष कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत मराठी लघुलेखक पदास रु.२०००-३२०० लागु करण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयात असलेल्या तरतुदीनुसार शासन मान्यते नंतर मराठी लघुलेखक या पदास ४ थ्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी रु. १६४०-२९०० लागु करतांना दिनांक १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीतील वेतन निश्चिती संबंधीची कोणतीही थकबाकी संबंधीतास अदा करण्यात आली नाही. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९च्या शासन निर्णयाच्या तरतुदी नुसार संबंधीताकडून क्षतिपुर्ती बंधपत्रे घेवुन दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीची थकबाकी रक्कम मंजुर करुन ती सबंधीत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत खात्या मध्ये वर्ग करण्याची तरतुद आहे. या बाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार श्री ऐ.पी. शिर्के मराठी लघुलेखक मनपा नांदेड यांनी उपरोक्त चे शासन निर्णयात नमुद असल्यानुसार क्षतिपुर्ती बंधपत्रे सादर केले असल्याने त्यांना १)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९ व २)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२०१/प्रक्र ७/सेवा-९/ दिनांक २७ नोव्हेंबर २००१ नुसार सुधारीत वेतनश्रेणी मध्ये दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीत केलेल्या वेतन निश्चितीनुसार अनुज्ञेय होणारी थकबाकी ची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात दिनांक १ ऑक्टोबर १९९९ पासून अनुज्ञेय व्याजासह वर्ग करण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

श्री अे.पी.शिर्के,यांची मुळ नेमणूक मराठी लघुलेखक या तांत्रिक संवर्गातील पदावर करण्यात आलेली असून त्यांना यापुढे कोणत्याही प्रकारची बढती नसल्यामूळे नांनपा आदेश क्र.साप्रवि/अस्था-१/४२१७/८९ दि.२१.६.१०८९ अन्वये त्यांच्या नेमणूकीच्या तारखेपासून म्हणजे दि.९.६.१९८१ पासून भोळे आयोगानूसार मराठी लघुलेखक यापदाची वेतनश्रेणी रु. ३९५-८०० मंजुर करण्यात आलेली आहे चौथ्या वेतन आयोगानुसार रु.१६४०-२९०० ही मंजुर करुन कालबध्द पदोन्नती नुसार १ऑक्टोबर १९९४ पासून २०००-३२००,पाचव्या वेतन आयोगानूसार ६५००-१०५०० व सहाव्या वेतन आयोगानूसार ९३००-३४८०० ही वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली असून आज पर्यत ते मराठी लघुलेखक यापदावर कार्यरत असून त्यांना वरच्या पदावर पदोन्नती देण्यात आलेली नाही व त्यांची एकटयाचीच तांत्रिक संवर्गातील सेवा जेष्ठता सुची स्वतंत्र आहे.परंतु कालबध्द पदोन्नती देतांना, पाचवा व सहावा वेतन आयोग लागू करतांना शासनाने पदोन्नतीच्या संधी नसलेल्या अशा एकांकी पदाना वेतन बॅड न बदलता

अधिक विशेष वेतन व अतिरिक्त ग्रेड वेतन मंजुर केलेले आहे ते श्री शिर्के,मराठी लघुलेखक यांना मंजुर करण्यात आलेले नाही. करीता २) महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. वेतन/प्रक्र.१०/सेवा-३/ दिनांक ३ ऑगस्ट २००१ मध्ये परिच्छेद क्र.३) दिनांक १ जानेवारी १९९६ पासून समकक्ष सुधारीत वेतनश्रेणीहून वरच्या सुधारीत वेतनश्रेणीत मंजुर करण्यात आल्या आहेत अशा एकांकी पदाच्या बाबतीत दि.१ जानेवारी १९९६ रोजी व त्यानंतर कालबध्द पदोन्नतीस पात्र होणा-या कर्मचा-यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-दोन मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतनश्रेणी अनूज्ञेय होइ्ल तसेच दि.१ ऑक्टोबर १९९४ ते ३१ डिसेंबर १९९५ या कालावधीत कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुर करण्यात आल्या अशा कर्मचा-यांना दि.१ जानेवारी १९९६ पासून त्यांच्या कनिष्ठा प्रमाणेचे परिशिष्ट दोन मध्ये नमूद केल्याप्रमाण् वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय होइ्ल अशी तरतूद आहे. करीता सदर शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट दोन प्रमाणे पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्विकृत शिफारशीनूसार पदास विहित केलेल्या सुधारीत वेतनश्रेणीकरीता कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत १ जानेवारी २००६ पासून अनुज्ञेय होणारी खालील प्रमाणे वरिष्ठ सुधारीत वेतनश्रेणी श्री अे.पी.शिर्के यांना लागू करण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

---

| अ.क्र. | विद्यमान सुधारीत वेतनश्रेणी | पदोन्नतीची सुधारीत वेतनश्रणी |
|---|---|---|
| ११ | ६५००-२००-१०५०० (पुर्वीच्या रु.२०००-३२०० या असुधारीत वेतनश्रेणीतील अराजपत्रीत कर्मचारी) | ६५००-२००-१०५०० अधिक विशेष वेतन रु.४००/- |

तसेच महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेतन/प्र.क्र.२/९९ दि.२० जूलै २००१ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दि.१ जुलै २०१० नुसार आदेश क्र.नांवामशमनपा/आस्था-१/६०५१/२०१३ दि.१८.१०.२०१२ अन्वये महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत योजना लागू करण्यात आलेली असून श्री अे.पी.शिर्के यांनी त्यांनाही आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मिळण्यासाठी अंतर्गत लेखा परिक्षण विभागातील संबंधित कर्मचारी श्री तिडके यांचेकडे दि. २५.२.२०१३ रोजी संचिका सादर केलेली असून सदरील संचिका निकाली काढण्यासाठी त्यांना वारंवार भेटून सुध्दा त्यांनी आज पर्यत काहीच कार्यवाही न करता संचिका प्रलंबित ठेवलेली आहे.त्यांच्या बरोबर जेवढया संचिका त्यांच्याकडे सादर करण्यात आल्या होत्या त्या सर्व संचिका मान्य झाल्या असून त्या सर्वांना ऑगस्ट २०१२ पासून प्रत्यक्ष लाभ देण्यत आलेला आहे. करीता महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दि.२२ एप्रिल २००९ व महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेतन-११०९/ प्र.क्र. ४१/सेवा-३ दि.५ जूलै २०१० मधील तरतुदी नुसार श्री अे.पी.शिर्के याना अतिरिक्त ग्रेड वेतन मंजुर करण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

उपरोक्त शासन निर्णयानूसार वेळोवेळी झालेल्या बदलानूसार नियमानूसार वेतन निश्चितीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच यावर होणाऱ्या खर्चाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवाशमनपा सालसन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकातील संबंधित शिर्षकातून हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**सुचक:-** विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक :-** नवलकुमार पोकर्णा

**प्रशासकीय अभिप्राय**

उपरोक्त प्रस्तावातील मुध्दा क्र.१ अंतर्गत लेखा परिक्षण विभागाचे खालील प्रमाणे खुलासा करण्यात येतो.

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९ अन्वये राज्य शासनाकडील लघुलेखक (निम्नश्रेणी) तसेच मंत्रालय,महाराष्ट्र लोक सेवा आयोग,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, लोकायुक्त,उपलोकआयुक्त यांचे कार्यालयातील सहायकांना रु.१६४०-२९०० या सुधारीत वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करण्यापोटी देय होणारी दि.१.१.१९८६ ते दि.३१.१२.१९९३ या कालावधीतील थकबाकी मंजुर करुन ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी असे या शासन निर्णयामध्ये तरतूद आहे. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त कालावधीची थकबाकी संबंधिताचे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये वर्ग करण्यात येइ्ल.

२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२०१/प्रक्र ७/सेवा-९/ दिनांक २७ नोव्हेंबर २००१ अन्वये परिच्छेद क्र.५ अ नुसार दि.७ सप्टेबर १९९९ अन्वये संबधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह खात्यात जमा करण्यात आलेल्या थकबाकीच्या रक्कमेवर दि.१ ऑक्टोबर १९९९ पासून व्याज अनुज्ञेय करण्यात यावे अशी तरतूद केलेली आहे सबंधिताच्या थकबाकी बाबत याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. वेतन/प्रक्र.१०/सेवा-३/ दिनांक ३ ऑगस्ट २००१ मध्ये परिच्छेद क्र.१ अ नुसार ज्या कर्मचा-यांना पदोन्नती साखळीत पदोन्नतीसाठी पद उपलब्ध्द नाही अशा कर्मचा-यांना तसेच एकांकी पदावरील कर्मचा-यांना दि.८ जून १९९५ च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या प्रमाणे पदोन्नतीची (वरिष्ठ) वेतनश्रेणी निश्चिती मंजुर करण्यात आली आहे त्यांना १ जानेवारी १९९६ पासून या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट -१ एक मध्ये नमूद केल्याप्रमाणे समकक्ष सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील अशी तरतूद आहे.संबंधिताना या शासन निर्णयानूसार परिशिष्ट एक मध्ये नमूद दि.१.१.१९९६ पुर्वीची अनुज्ञेय वेतनश्रेणी रु.६५००-२००-१०५०० दिनांक १.१.१९९६ पासून लागू केलेली आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद (३) प्रमाण् १ ऑक्टोबर १९९४ ते

३१.१२.१९९५ या कालावधीत कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुर करण्यात आलेल्या अशा कर्मचा-यांना १ जानेवारी १९९६ पासून त्यांच्या कनिष्ठा प्रमाणे परिशिष्ट - दोन मध्ये नमूद केल्या प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल अशी तरतूद आहे. तथापी श्री ए.पी.शिर्के यांचे पेक्षा कनिष्ट लघुलेखक या कार्यालयात कार्यरत नसल्याने सदरील मुद्या लागू होत नाही. त्यामूळे त्यांना परिच्छेद क्र.३ चा लाभ देता येत नाही .

४) सबंधितांना वित्त विभागाचे शासन निर्णय क्र. वेतन-११०९/ प्र.क्र. ४१/सेवा-३ दि.५ जूलै २०१० च्या सुधारीत आश्वासीत प्रगती योजने नुसार या शासन निर्णयातील योजनेचा दुसरा लाभ देतांना संबंधितांना अनुज्ञेय अतिरिक्त ग्रेड वेतन रु.६००/- अनुज्ञेय आहे त्याप्रमाणे त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

**दिपकसिंह रावत** श्री ए.पी.शिर्के, यांनी शासन निर्णयानुसार सुधारीत वेतनश्रेणीची थकबाकीची रक्कम देण्यासाठी, २४ वर्षानंतर आश्वासीत योजना लागु करण्यासाठी,व सहाव्या वेतन आयोगात चुकीची करण्यात आलेली वेतननिश्चिती सुधारीत करण्यासाठी विनंती अर्ज सादर केलेले आहे तरी शासन निर्णयानुसार व प्रशासकीय टिप्पणीनुसार या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** श्री दिपकसिंह रावत यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**महापौर** मुख्य लेखा परिक्षक यांनी श्री ए.पी.शिर्के यांचे पेक्षा कनिष्ट लघुलेखक या कार्यालयात कार्यरत नसल्याने महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. वेतन/प्रक्र.१०/सेवा-३/ दिनांक ३ ऑगस्ट २००१ नुसार रु.४००/- विशेष वेतन देता येत नसल्याचा अभिप्राय दिलेला असल्यामूळे रु.४००/- विशेष वेतन देण्याची बाब ना मंजुर करण्यात येते. शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९ व २)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२०१/प्रक्र ७/सेवा-९/ दिनांक २७ नोव्हेंबर २००१ नुसार सुधारीत वेतनश्रेणी मध्ये दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीत केलेल्या वेतन निश्चितीनुसार अनुज्ञेय होणारी थकबाकी ची रक्कम श्री ए.पी.शिर्के यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात दिनांक १ ऑक्टोबर १९९९ पासून अनुज्ञेय व्याजासह वर्ग करण्याची मान्यता देण्यात येते तसेच महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दि.२२ एप्रिल २००९) मधील नियम क्र.१४ (३) (क) च्या तरतूदीनूसार व महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि.२९ एप्रिल २००९ नुसार रु.४००/-अतिरिक्त ग्रेड वेतन मंजुर करुन त्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी निश्चीत करुन त्यांचा लाभ श्री ए.पी.शिर्के ,मराठी लघुलेखक यांना देण्यास मान्यता देण्यात येते. उपरोक्त शासन निर्णय प्रमाणे आयुक्तांनी नियमानूसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९७** **ठ रा व**

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रं. वेपुर/प्रक्र.७४/९४/सेवा-१०/ दिनांक २२ एप्रिल १९९४ मधील तरतुदीनुसार श्री ऐ.पी. शिर्के मराठी लघुलेखक मनपा नांदेड यांच्या पदास वेतन श्रेणी रुपये १६४०-२९०० लागु करण्यात आली असुन या वेतनश्रेणीच्या समकक्ष कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत मराठी लघुलेखक पदास रु.२०००-३२०० लागु करण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयात असलेल्या तरतुदीनुसार शासन मान्यते नंतर मराठी लघुलेखक या पदास ४ थ्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी रु. १६४०-२९०० लागु करतांना दिनांक १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीतील वेतन निश्चिती संबंधीची कोणतीही थकबाकी संबंधीतास अदा करण्यात आली नाही. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९च्या शासन निर्णयाच्या तरतुदी नुसार संबंधीताकडून क्षतिपुर्ती बंधपत्रे घेवुन दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीची थकबाकी रक्कम मंजुर करुन ती सबंधीत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत खात्या मध्ये वर्ग करण्याची तरतुद आहे. श्री ऐ.पी. शिर्के मराठी लघुलेखक मनपा नांदेड यांनी उपरोक्त चे शासन निर्णयात नमुद असल्यानुसार क्षतिपुर्ती बंधपत्रे सादर केले असल्याने त्यांच्या दि.३.१०.२००३ च्या विनंती अर्जानुसार व मुख्य लेखापरिक्षक. नांवामनपा नांदेड यांनी दिलेल्या प्रशासकीय अभिप्रायानुसार १)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२९९/प्रक्र २५/९९/सेवा-१०/ दिनांक ७ सप्टेंबर १९९९ व २)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर/१२०१/प्रक्र ७/सेवा-९/ दिनांक २७ नोव्हेंबर २००१ नुसार सुधारीत वेतनश्रेणी मध्ये दि. १.१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीत केलेल्या वेतन निश्चितीनुसार अनुज्ञेय होणारी थकबाकी ची रक्कम श्री ए.पी.शिर्के यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात दिनांक १ ऑक्टोबर १९९९ पासून अनुज्ञेय व्याजासह वर्ग करण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

तसेच श्री ए.पी.शिर्के ,मराठी लघुलेखक यांनी दि.७.१२.२०१३ रोजीच्या विनंती अर्जाव्दारे म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम २००९ (महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दि.२२ एप्रिल २००९) मधील नियम क्र.१४ (३) (क) च्या तरतूदीनूसार व महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि.२९ एप्रिल २००९ नुसार सहावा वेतन आयोगाची वेतन निश्चिती करतांना वेतनात रु.४००/- अतिरिक्त ग्रेड वेतन देण्यात येत नसल्यामूळे दि.१.१.२००६ पासून रु.४००/- अतिरिक्त ग्रेड वेतन लागू करुन त्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी निश्चीत करुन त्यांचा लाभ देण्याची विनंती मुख्य लेखाधिकारी, नांवामनपा नांदेड यांना केलेली आहे.(सदर शासन निर्णयानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील .व जिल्हा

परिषद नांदेड मध्ये कार्यरत लघुलेखकास कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ मंजुर करण्यात आल्यानंतर सहाव्या वेतन आयोगात रु.४००/- अतिरिक्त ग्रेड पे देण्यात येत आहे.)

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि.२९ एप्रिल २००९ मधील परिच्छेद क्र.१३ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे पदोन्नतीच्या संधी उपलब्ध्द नसलेल्या व चौथ्या वेतन आयोगानूसार रु. १६४०-६०-२६००-ईबी-७५-२९०० या वेतनश्रेणीत वेतन श्रेणी घेत असलेले श्री अे.पी शिर्के यांना दि.१.१.१९९६ पुर्वी कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत रु.२०००-६०-२३००-दरो-७५-३२००ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होती.पाचव्या वेतन आयोगानूसार या वेतनश्रेणीना अनुक्रमे रु. रु.५५००-१७५-९००० आणि रु.६५००-२००-१०५०० या समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरतात चौथ्या वेतन आयोगातील रु. १६४०-६०-२६००-ईबी-७५-२९०० या वेतनश्रेणीकरीता ( पाचव्या वेतन आयोगातील रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीकरीता) सहाव्या वेतन आयोगानूसार पीबी-२ वेतनबॅण्ड + रु.४३०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.दि.१.१.२००६ व त्यानंतर सुधारीत वेतन संरचनेत वेतन निश्चिती करतांना सदर कर्मचा-यास पीबी-२ वेतनबॅण्ड (कालबध्द पदोन्नतीपूर्वी रु.१६४०-६०-२६००-ईबी-७५-२९०० या त्यांच्या मूळ वेतनश्रेणीत अनुज्ञेय असलेला आणि रु. रु.४३००+४०० म्हणजेच रु.४७०० ग्रेड वेतन दि.१.१.२००६ पासून अनुज्ञेय होईल.

करीता उपरोक्त प्रमाणे म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम २००९ (महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दि.२२ एप्रिल २००९) मधील नियम क्र.१४ (३) (क) (कालबध्द पदोन्नती अथवा आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापुर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेडवेतन रु.४००० पेक्षा जास्त व रु.५००० पेक्षा कमी असल्यास- अतिरिक्त ग्रेडवेतन रु.४००) च्या तरतूदीनूसार व महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि.२९ एप्रिल २००९ नुसार दि.१.१.२००६ पासून रु.४००/-अतिरिक्त ग्रेड वेतन मंजुर करुन त्याप्रमाणे वेतनश्रेणी निश्चीत करुन त्यांचा लाभ श्री अे.पी.शिर्के ,मराठी लघुलेखक यांना देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. उपरोक्त शासन निर्णयानुसार आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

तसेच महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र. ४१/सेवा-३ दि.५ जूलै २०१० नुसार व नांवामनपा आदेश क्र.नांवामशमनपा/आस्था-१/६०५१/२०१३ दि.१८.१०.२०१२ मधील तरतुदी नुसार श्री अे.पी.शिर्के यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजुर करण्यात आला त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

## विशेष बाब म्हणून आयत्यावेळी घेण्यात आलेले तातडीचे विषय

**विषय क्र.१**

संदर्भ:- १) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.२०१३/नपाप्र/का-१/टे-४ प्र.क्र.दि.१२.११.२०१३
२) सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९७ दि.२८.२.२०१३
३) पत्र क्र.साबांवि/२०५२५/२०१३ दि.२५.११.२०१३
४) पत्र क्र.नांवाशमनपा/नसका/सीआर-४७/२०१४ दि.१०.१.२०१४

महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : अविवि-२००९/प्र.क्र.४३/०९/का-१/ दि. ९ फेब्रुवारी २००९ अन्वये केंद्र शासनाने महाराष्ट्रातील निश्चीत केलेल्या ४३ अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी प्राधान्याने तसेच ज्या शहराच्या एकुण लोकसंख्ये पैकी १०% पेक्षा जास्त अल्पसंख्याकाची लोकसंख्या (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी) आहे, अशा शहरातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागा तर्फे अनुदान दिले जाणार असून मुलभूत नागरी सुविधांच्या उपलब्धतेसाठी खालील प्रमाणे कामे घेण्याबाबत सुचित केले आहे.

१) कब्रस्तानची व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती
२) पिण्याच्या पाण्याची सुविधा
३) विद्युत पुरवठा
४) सांडपाण्याची व्यवस्था
५) रस्ते/ पथदिवे
६) सार्वजनिक स्वच्छतागृह
७) आंगणवाडी, बालवाडी केंद्र, इत्यादी

तसेच मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि. १२.११.२०१३ रोजी आलेल्या पत्राने अल्प संख्याक बहुल क्षेत्रात विकास योजनेचे कामे सन २०१३-१४ करिता प्रस्तावित करण्यासाठी कळविण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये खालील प्रमाणे कामे सुचविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामांचे नांव<br>**झोन क्र. २** | अंदाजित रक्कम रु. लक्षात |
|---|---|---|---|
| १ | १३ | नंदीग्राम सोसायटी भागात अंतर्गत सिमेंट रस्ते करणे | ५.०० |
| २ | २४ | प्रभाग क्र.२४ (अ व ब )मधील रहेमतनगर भागात जि.प.शाळा ते बशीरभाई (रोड नं.९) पर्यत आर.सी.सी.नाली बांधकाम करणे | ५.०० |
| ३ | २५ | प्रभाग क्र.२५ (अ व ब )मधील पाकीजानगर भागात घूडूभाई यांचे घर ते हैद्राबाद रोडपर्यत आर.सी.सी.भिंती,पाय-या व सि.सि.रोडचे बांधकाम करणे. | ५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १९ | बरकतपुरा भागात ताकी यांचे घर मुस्तफा हॉटेल पर्यत (सहारा मस्जीद) आर.सी.सी. नाली करणे | २.५० |
| ५ | १९ | बारा इमाम मस्जिद रोड समोर सी.सी.रोड व नाली रोड करणे. | २.५० |
| | | एकूण रुपये | २०.०० |

करीता वरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९८** **ठ रा व**

.नांदेड वाधाळा शहर महानगपालिकेने दिनांक २८.२.२०१३ ठराव क्र.१९७ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील प्रभाग क्र.१३, १९, २४, २५, ३७,या प्रभागात अल्पसंख्याकाचे प्रमाण अधिक असल्यामूळे सदर प्रभाग हे अल्पसंख्याक बहुल क्षेत्र म्हणून घोषित करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.प्रभाग क्र.३७ हा शासनाच्या निकषात बसत नसल्यामूळे प्रभाग क्र.३७ वगळून प्रभाग क्र. १३,२४,२५,१९ या प्रभागात अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात विकास योजने अंतर्गत सन २०१३-१४ करिता खालील तक्यात दर्शविण्यात आलेली मुलभूत नागरी सुविधाची कामे करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम रु. लक्षात |
|---|---|---|---|
| १ | १३ | नंदीग्राम सोसायटी भागात अंतर्गत सिमेंट रस्ते करणे | ५.०० |
| २ | २४ | प्रभाग क्र.२४ (अ व ब )मधील रहेमतनगर भागात जि.प.शाळा ते बशीरभाई (रोड नं.९) पर्यत आर.सी.सी.नाली बांधकाम करणे | ५.०० |
| ३ | २५ | प्रभाग क्र.२५ (अ व ब )मधील पाकीजानगर भागात घूडूभाई यांचे घर ते हैद्राबाद रोडपर्यत आर.सी.सी.भिंती,पाय-या व सि.सि.रोडचे बांधकाम करणे. | ५.०० |
| ४ | १९ | बरकतपुरा भागात ताकी यांचे घर मुस्तफा हॉटेल पर्यत (सहारा मस्जीद) आर.सी.सी. नाली करणे | २.५० |
| ५ | १९ | बारा इमाम मस्जिद रोड समोर सी.सी.रोड व नाली रोड करणे. | २.५० |
| | | एकूण रुपये | २०.०० |

**विषय क्र.२**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.नगरो-२०१०/प्र.क्र.५२/नवि-३३ दि.३१ मार्च २०१० अन्वये रस्ते विकास प्रकल्प रु.११.९५ कोटीला शासनाने मंजुरी प्रदान केली असून सन २०१०-११ या आर्थिक वर्षात याच योजने अंतर्गत शासन निर्णय क्र. क्र.नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ दि.२३ फेब्रूवारी २०११ अन्वये रस्ते विकास प्रकल्प रु.८८.२३ कोटी व तरोडा पाणी पुरवठा योजना भाग -१ रु.११.५६ कोटीला शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे. शासनाने उपरोक्त प्रमाणे मंजुर केलेल्या ३ प्रकल्पाची एकूण किमत रु.१११.७४ कोटी होत आहे.नगरोत्थान योजने अंतर्गत ५० टक्के हिस्सा राज्य शासन अनुदान म्हणून देते व उर्वरीत ५० टक्के खर्च हा महानगरपालिकेने करावयाचा आहे.महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२७ दि.१५.३.२०१२ अन्वये मुनिफ्रा यांचेकडून कर्ज घेण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात आली होती परंतू मुनिफ्रा यांनी कर्ज देण्यास प्रतिसाद दिला नाही. तसेच नगरोत्थान अंतर्गतची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी महानगरपालिकेचा हिस्सा तातडीने भरणे आवश्यक आहे. व त्यानंतरच नगरोत्थान योजने अंतर्गत तिनही प्रकल्प पुर्ण करणे शक्य होईल.महानगरपालिकेने करावयाचा ५० टक्केखर्च भागविण्याकरीता हे हाऊसिंग एण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.(हुडको) मुंबई यांनी कर्ज संमती दिली आहे.

करीता महानगरपालिकेच्या हिश्यासाठी ५० टक्के रक्कम उभी करण्यासाठी हाऊसिंग एण्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.(हूडको) मुंबई यांचेकडून कर्ज घेण्याच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सभेसमोर सादर

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१९९** **ठ रा व**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.नगरो-२०१०/प्र.क्र.५२/नवि-३३ दि.३१ मार्च २०१० अन्वये रस्ते विकास प्रकल्प रु.११.९५ कोटीला शासनाने मंजुरी प्रदान केली असून सन २०१०-११ या आर्थिक वर्षात याच योजने अंतर्गत शासन निर्णय क्र. क्र.नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ दि.२३ फेब्रूवारी २०११ अन्वये रस्ते विकास प्रकल्प रु.८८.२३ कोटी व तरोडा पाणी पुरवठा योजना भाग -१ रु.११.५६ कोटीला शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे. शासनाने उपरोक्त प्रमाणे मंजुर केलेल्या ३
प्रकल्पाची एकूण किमत रु.१११.७४ कोटी होत आहे.नगरोत्थान योजने अंतर्गत ५० टक्के हिस्सा राज्य शासन अनुदान म्हणून देते व उर्वरीत ५० टक्के खर्च हा महानगरपालिकेने करावयाचा आहे.महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२७

दि.१५.३.२०१२ अन्वये मुनिफ्रा यांचेकडून कर्ज घेण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात आली होती परंतू मुनिफ्रा यांनी कर्ज देण्यास प्रतिसाद दिला नाही. तसेच नगरोत्थान अंतर्गतची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी महानगरपालिकेचा हिस्सा तातडीने भरणे आवश्यक आहे. व त्यानंतरच नगरोत्थान योजने अंतर्गत तिनही प्रकल्प पुर्ण करणे शक्य होईल.महानगरपालिकेने करावयाचा ५० टक्केखर्च भागविण्याकरीता हे हाऊसिंग एण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.(हुडको) मुंबई यांनी कर्ज संमती दिली आहे.

करीता महानगरपालिकेच्या हिश्यासाठी ५० टक्के रक्कम उभी करण्यासाठी हाऊसिंग एण्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.(हूडको) मुंबई यांचेकडून कर्ज घेण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३**

नांदेड शहरात यापुर्वी BOT तत्वावर शहर बस थांबे उभारण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या तथापी त्यास प्रतिसाद मिळाला नाही शहरातील प्रवाशांच्या सुविधेसाठी शहर बस थांबे अभारणे गरजेचे आहे. याकरीता अभिकर्त्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन शहर बस थांबे उभारण्यासाठी परवानगी देणे योग्य वाटते.

१. शहर बस थांबे उभारणेसाठी सध्या ५० जागा निश्चित केलेल्या आहेत. जागा उपलब्धे नुसार बस थांब्या शेजारी मल्टी युटीलिटी काउंटर, एटीएम उभारण्याची अनुमती अभिकर्त्यास देणे.
२. सदरचा BOT प्रकल्प संबंधितास कार्यादेश दिल्यापासुन १५ वर्षाचे कालावधीसाठी राहील. या काळात सर्व बस स्टॉपची दैनंदिन साफसफाई, देखभाल, दुरुस्ती अभिकर्त्यास करावी लागेल.
३. प्रति बस स्टॉप प्रति वर्ष याप्रमाणे रॉयल्टी आकारणे, प्रत्येक तीन वर्षात त्यात वाढ करणे, जाहिरात कर आकारणे या तत्वावर बस थांबे उभारण्याची परवानगी देणे.

वरील प्रमाणे सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधिन राहुन BOT तत्वावर निविदाप्रक्रिया करण्याची अनुमती प्रदान करणे व या बाबतचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्याचे मान्यतेस्तव सादर.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२००** **ठ रा व**

नांदेड शहरात यापुर्वी BOT तत्वावर शहर बस थांबे उभारण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या तथापी त्यास प्रतिसाद मिळाला नाही शहरातील प्रवाशांच्या सुविधेसाठी शहर बस थांबे अभारणे गरजेचे आहे. याकरीता अभिकर्त्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन शहर बस थांबे उभारण्यासाठी ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते परवानगी देते तसेच खालील सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधिन राहुन BOT तत्वावर निविदाप्रक्रिया करण्याची अनुमती प्रदान करणे व या बाबतचे सर्व अधिकार आयुक्तांना ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

१. शहर बस थांबे उभारणेसाठी सध्या ५० जागा निश्चित केलेल्या आहेत. जागा उपलब्धे नुसार बस थांब्या शेजारी मल्टी युटीलिटी काउंटर, एटीएम उभारण्याची अनुमती अभिकर्त्यास देणे.
२. सदरचा BOT प्रकल्प संबंधितास कार्यादेश दिल्यापासुन १५ वर्षाचे कालावधीसाठी राहील. या काळात सर्व बस स्टॉपची दैनंदिन साफसफाई, देखभाल, दुरुस्ती अभिकर्त्यास करावी लागेल.
३. प्रति बस स्टॉप प्रति वर्ष याप्रमाणे रॉयल्टी आकारणे, प्रत्येक तीन वर्षात त्यात वाढ करणे, जाहिरात कर आकारणे या तत्वावर बस थांबे उभारण्याची परवानगी देणे.

**विषय क्र.४**

राजर्षी शाहू महाराज पुर्णकृती पुतळा उभारण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांची नांदेड मधील मौजे जंगमवाडी येथील गट क्रमांक २१/२ क्षेत्र ४.०१ हेक्टरपैकी ३६७५.५५ चौ.मी जागा महानगरपालिक, नांदेड यांना हस्तांतर करण्याकरीता महाराष्ट्र शासनाचा निर्णय जा.क्र.मकृषि२०१३/प्र.क्र. ४/७ अ, दि.३०.११.२०१३ नुसार निर्णय झालेला आहे. उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कृषि विद्यापीठाने सदरील जागा महानगरपालिका, नांदेडकडे हस्तांतर काही अटी व शर्तीनुसार करावयाचे आहे. सदरील अटी व शर्ती मधील अट क्रमांक १४ नुसार कृषि विद्यापीठाच्या सहमतीने कार्यवाही करून नंतरच जागा हस्तातरणाची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. विषयांकीत हस्तांतरणाकरीता कृषी विद्यापीठचे कुलगुरु तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावर बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीस नांदेडचे जिल्हाधिकारी, महानगगरपालिकेतर्फे आयुक्त व कृषि विद्यापीठाचे कुलसचिव हे उपस्थीत होते. बैठकी दरम्यान मा. विभागीय आयुक्तांनी उपरोक्त जागा हसतांतरणाकरीता जागेच्या मुल्यांकनाप्रमाणे मावेजा विद्यापीठास देऊन ताबा देण्याचे तत्वत: मान्ये केले आहे.सदरील जागेचे मुल्यांकन सहा.दुय्यम निबंधक वर्ग -२ नांदेड यांचे दि.१२.१२.२०१३ च्या मुल्यांकनानूसार एकूण १,०५,२८,४५२/-रुपये होत आहे.मा.विभागिय आयुक्तांनी सदरील जागेचा मावेजा समान हप्त्यामधे् विद्यापिठास अदा करण्याचे सुचित केले तसेच सदरील हस्तांतरण व मावेजा देण्याच्या प्रक्रियेमध्ये मा.जिल्हाधिकारी ,नांदेड हे मध्यस्थांची भूमिका अदा करतील असे विभागिय आयुक्तांनी सुचित केलेले आहे. सदरील हस्तांतरण व मावेजा चार समान हप्त्यामध्ये देण्यासंबंधी महानगरपालिका एक हमी पत्र जिल्हाधिकारी नांदेड यांना देवून पुढील कार्यवाही करील असे विभागिय आयुक्तंनी सुचिविलेले आहे.

विषयांकित प्रकरणी जागा हस्तांतरण करण्यासंबंधी शासनस्तरावर वाटाघाटी सुरु असुन सदरील वाटाघाटीमधे् जागेच्या मावेजा पोटी द्यावयाची रक्कम हमीपत्र किंवा इतर अनुषगीक बाबीसबंधी निर्णय धेण्याकरीता आयुक्तांनी अधिकार प्रदान करणे संदर्भात प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०१** **ठ रा व**

राजर्षी शाहू महाराज पुर्णकृती पुतळा उभारण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांची नांदेड मधील मौजे जंगमवाडी येथील गट क्रमांक २१/२ क्षेत्र ४.०१ हेक्टरपैकी ३६७५.५५ चौ.मी जागा महानगरपालिक, नांदेड यांना हस्तांतर करण्याकरीता महाराष्ट्र शासनाचा निर्णय जा.क्र.मकृषि२०१३/प्र.क्र. ४/७ अ, दि.३०.११.२०१३ नुसार निर्णय झालेला आहे. उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कृषि विद्यापीठाने सदरील जागा महानगरपालिका, नांदेडकडे हस्तांतर काही अटी व शर्तीनुसार करावयाचे आहे. सदरील अटी व शर्ती मधील अट क्रमांक १४ नुसार कृषि विद्यापीठाच्या सहमतीने कार्यवाही करून नंतरच जागा हस्तातरणाची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. विषयांकीत हस्तांतरणाकरीता कृषी विद्यापीठचे कुलगुरु तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावर बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीस नांदेडचे जिल्हाधिकारी, महानगगरपालिकेतर्फे आयुक्त व कृषि विद्यापीठाचे कुलसचिव हे उपस्थीत होते. बैठकी दरम्यान मा. विभागीय आयुक्तांनी उपरोक्त जागा हस्तांतरणाकरीता जागेच्या मुल्यांकनाप्रमाणे मावेजा विद्यापीठास देऊन ताबा देण्याचे तत्वतः मान्ये केले आहे.सदरील जागेचे मुल्यांकन सहा.दुय्यम निबंधक वर्ग -२ नांदेड यांचे दि.१२.१२.२०१३ च्या मुल्यांकनानूसार एकूण १,०५,२८,४५२/-रुपये होत आहे.मा.विभागिय आयुक्तांनी सदरील जागेचा मावेजा समान हप्त्यामधे् विद्यापिठास अदा करण्याचे सुचित केले तसेच सदरील हस्तांतरण व मावेजा देण्याच्या प्रक्रियेमध्ये मा.जिल्हाधिकारी ,नांदेड हे मध्यस्थांची भूमिका अदा करतील असे विभागिय आयुक्तांनी सुचित केलेले आहे. सदरील हस्तांतरण व मावेजा चार समान हप्त्यामध्ये देण्यासंबंधी महानगरपालिका एक हमी पत्र जिल्हाधिकारी नांदेड यांना देवून पुढील कार्यवाही करील असे विभागिय आयुक्तंनी सुचविलेले आहे.

करीता राजर्षी शाहू महाराज पुर्णकृती पुतळा उभारण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांची नांदेड मधील मौजे जंगमवाडी येथील गट क्रमांक २१/२ क्षेत्र ४.०१ हेक्टरपैकी ३६७५.५५ चौ.मी जागा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी जागेच्या मावेजा पोटी द्यावयाची रक्कम, हमीपत्र किंवा इतर अनुषगीक बाबीसबंधी निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार आयुक्तं नांवामनपा नांदेड यांना ही नावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**दिपकसिंह रावत** नांवामशमनपा व स्व.मिनाताई ठाकरे प्रतिष्ठान यांच्या सयुक्त विद्यमाने दरवर्षी कैं.प्रकाश खेडकर अखिल भारतीय कवि संम्मेलनाचे आयोजन करण्यात येते करीता दरवर्षा प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे या विराट कवि संम्मेलनासाठी रुपये २.०० लक्षाची आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव मा.महापौराकडे दिलेला असून या प्रस्तावास सौ.सुदर्शना महेश (बाळू) खोमणे यांनी अनूमोदन दिलले आहे सदर प्रस्तावास वशेष म्हणून मान्यता देण्यात यावी.

**महापौर** श्री दिपकसिंह रावत व सौ.सुदर्शना खोमणे यांनी नांवामशमनपा व स्व.मिनाताई ठाकरे प्रतिष्ठान यांच्या सयुक्त विद्यमाने दरवर्षी कैं.प्रकाश खेडकर अखिल भारतीय कवि संम्मेलनाचे आयोजन करण्यात येते करीता दरवर्षा प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे या विराट कवि संम्मेलनासाठी रुपये २.०० लक्षाची आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे करीता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०२** **ठराव**

नांवामशमनपा व स्व.मिनाताई ठाकरे प्रतिष्ठान यांच्या सयुक्त विद्यमाने दरवर्षी कै.प्रकाश खेडकर अखिल भारतीय कवि संम्मेलनाचे आयोजन करण्यात येते करीता .दरवर्षा प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे या विराट कवि संम्मेलनासाठी रुपये २.०० लक्षाची आर्थिक मदत देण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभे्त कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड | नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका, नांदेड. |